cmyk

## संपादकीय

### तिढा सुटता सुटेना!

भारत आणि अमेरिकेमध्ये सुरू असलेला व्यापार करारासंबंधीचा तिढा अद्याप सुटलेला नाही उलट त्यासंबंधीचा गुंता वरचेवर वाढतच चालला आहे. त्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताबरोबर कोणताही व्यापार करणार नसल्याचे सांगून तेल ओतण्याचेच काम केले आहे. जोपर्यंत आयात शुल्काचा मुद्दा सुटत नाही, तोपर्यंत भारतासोबत कोणतीही चर्चा होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. अमेरिकेने सध्या भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावले आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com    नवी दिशा... नवे विचार.....    email:rajyaloktantra75@gmail.com


### ठाकरेंनी मातोश्री-२ वर फडणवीस कृपा लिहा-राणे

मुंबई : मस्त्य व बंदरे विकासमंत्री नितेश राणेंनी उद्धव ठाकरेंवर टीका केली असून उद्धव ठाकरेंचे मातोश्री-२ हे घर फडणवीसकृपेने तयार झाल्याचा आरोप नितेश राणेंनी केला आहे. त्यामुळे मातोश्री-२ या बंगल्यावर फडणवीस कृपा असे लिहावे असे सांगून उद्धव ठाकरेंना वर्षभर फुकट मासे दिल्यास त्यांना माझे खातेही आवडू लागेल असा मिश्किल टोलाही त्यांनी लगावला आहे.

बीड - महाराष्ट्र    वर्ष-५    अंक-१०८    मंगळवार, दि.१२ ऑगस्ट २०२५    RNI No.: MAHMAR/2021/85884    NO.L SB/BEED/RNP-206/2024-26    पाने-६    किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### महाराष्ट्र भ्रष्टाचाराच्या यादीत १ नंबरवर-उद्धव ठाकरे

मुंबई-महाराष्ट्र भ्रष्टाचाराच्या यादीत १ नंबरवर असून आम्ही भ्रष्टाचाराविरोधात रस्त्यावर उतरलो आहोत, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी फडणवीस सरकारच्या विरोधात आक्रमक भुमिका घेतली.

### खेडमध्ये पिकअप दरीत कोसळली, ७ जणांचा मृत्यू

पुणे : जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील कुंडेश्वर दर्शनाला जात असताना भीषण अपघात झाला असून या भीषण अपघातात भाविकांनी भरलेले पिकअप गाडी थेट १०० फूट खोल दरीत कोसळली आहे. यात ७ जणांचा मृत्यू झाला तर २३ जणांची प्रकृती गंभीर आहे. श्रावण महिन्यातील तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त कुंडेश्वर दर्शनाला जात असताना हा अपघात झाला.

### शिरसाट मीडियावर घसरले

छ. संभाजीनगर : सातत्याने विविध कारणामुळे चर्चेत असलेले संजय शिरसाट थेट मीडियावरच घसरले आहेत. काहीही बोलले की लगेच बातम्या होतात असे म्हणत त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. सोबतच घरातील बॅग पाहिली बापही झाला, आणखी काय पाहायचंय? असा सवालही त्यांनी केला. संभाजीनगरमधील बंजारा समाजाच्या एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे विधान केले आहे.

### देशातील महागड्या १० शहरांची यादी जाहीर

नवी दिल्ली-देशातील सर्वात महागड्या दहा शहरांमध्ये मुंबई देशातील नंबर एक स्थानी कायम आहे. मात्र, यात उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊ शहराचा समावेश पहिल्यांदाच झाला असून उत्तर प्रदेशात नोएडा आणि गाझियाबाद हे सर्वात महागडी शहरे आहेत. जिल्हा प्रशासनाने दहा वर्षांनंतर लखनऊच्या सर्कल रेटमध्ये वाढ केली आहे. त्यामुळे या शहरातील जमीनी, घर, दुकानं खरेदी अधिक शुल्क लागणारेय. जमिनीच्या दरांत ३० ते १३० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

### बीडचे अजितदादा, रायगडचे ध्वजारोहण आदिती तटकरे करणार

मुंबई-बीडचे १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री अजित पवार तर रायगडचे ध्वजारोहण आदिती तटकरे करणार आहेत. शिवसेनेच्या भरत गोगावलेंची पुन्हा निराशा झाली असून शिवसेनेने रायगडच्या पालकमंत्रिपदावर दावा केला होता.

# पिकविम्याचे ३९०० कोटी वितरित

## केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची माहिती; लवकरच ७५०० कोटीही मिळणार

नवी दिल्ली । प्रतिनिधी

पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगामातील पिकांच्या नुकसान भरपाईसाठी ३५ लाख शेतकऱ्यांना ३ हजार ९०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता दि.११ ऑगस्ट रोजी वितरीत करण्यात आला. देशभरातील ३५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पहिला हप्ता जमा झाला आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राजस्थानमधील झुंझनु येथील






कार्यक्रमात बटन दाबून रक्कम हस्तांतरित केली. तसेच लवकरच दुसऱ्या हप्त्याची ७ हजार ५०० कोटी रुपयांची रक्कमही वितरित केली जाणार आहे.

गेल्या वर्षी रब्बीचा विमा शेतकऱ्यांना मिळाला नव्हता. केंद्र सरकारने तो लवकर दिला जाईल, असे सांगितले होते. त्यानुसार दि. ११ रोजी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी पहिल्या हप्त्याचे ३९०० कोटी रुपये वितरित केले. या कार्यक्रमात बोलताना कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, एका गावातील शेतकऱ्याचे नुकसान झाले तरी देखील सरकार त्या संबंधित शेतकऱ्याला भरपाई देईल. हे सरकार कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. पिक विम्याची ही रक्कम ३५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली आहे.

### जुन्या पीकविमा योजनेतील त्रुटी नव्यातही कायम

हवामानावर आधारित फळ पीकविमा योजनेत केळी पिकासंबंधी परतावा मानके किंवा निकष (ट्रीगर) मागील हंगामापूर्वी लागू केले आहेत. जुने निकष लागू केलेले असले तरी काही उणीवा, त्रुटी या योजनेत ठेवल्या आहेत. यात केळी पिकासंबंधी करपा, कुकुंभर मोझॅक विषाणू (सीएमव्ही) या समस्यांसाठी विमा संरक्षण देण्यात आलेले नाही. तसेच वादळासंबंधीदेखील १ मार्च ते ३१ जुलै या कालावधीसाठी विमा संरक्षण आहे. पण खानदेशात केळीला बारमाही वादळाचा फटका बसतो. यामुळे वादळासंबंधीचे विमा संरक्षण एक वर्षासाठी किंवा किमान ११ महिन्यांसाठी असावे, अशी मागणीही शेतकरी करीत आहेत.

## मृत्यूनंतरही दोन जिवलग मित्र सोबतच; स्व.विलासरावांच्या शेजारीच मुंडे साहेबांचा पुतळा

# मुंडे साहेबांनाच मुख्यमंत्री करणार होतो

## देवेंद्र फडणवीस: लातूर येथे स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण

लातूर । प्रतिनिधी

नरेंद्र मोदींना उधारीवर मुंडे साहेबांना दिले आहे. आम्ही त्यांना परत आणणार आणि मुख्यमंत्रिपदावर बसवणार हे मी त्यावेळी म्हणायचो. पण, दुर्दैवाने ते शक्य होऊ शकले नाही असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर येथील स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळा अनावरण सोहळ्यात बोलताना केले. यावेळी मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री शिवेंद्रराजे भोसले आदि उपस्थित होते. दोस्तीच्या दुनियातील खरे



बादशहा असलेले स्व. विलासराव देशमुख आणि स्व. गोपीनाथ मुंडे यांचे पुतळे हे लातूरमध्ये शेजारी-शेजारी आहेत. ▶▶ पान २ वर

### मुंडे साहेबांनीच मला वारस घोषित केले : पंकजा मुंडे



मुंडे साहेबांनी त्यांच्या जिवंतपणीच मला वारस घोषित केले. त्यामुळे त्या वारशासोबत संघर्ष आणि कारस्थानही माझ्या वाटेला आले असे वक्तव्य राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. फेकलेले तुकडे घ्यायचे नाहीत, नेहमीच बेरजेचं राजकारण करायचे अशी वडिलांनी शिकवण दिली. माझ्या वडिलांनी त्यांच्या तोंडातून सांगितले की मी त्यांची वारस आहे. त्यामुळे त्या वारशाला सुईच्या टोकाइतकाही धक्का लागू देणार नाही असे पंकजा मुंडे म्हणाल्या. मुंडे साहेबांच्या वारशासोबत संघर्ष आला, अडचणी आल्या. परंतु आम्ही संस्कारात वागलो, कुणाबद्दलही वाईट विचार केला नाही असे त्या म्हणाल्या.

### संघर्ष पाचवीला पूजलेला : धनंजय मुंडे



माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडेंनी आपल्या भाषणातून त्यांचा संघर्ष सांगितला, तसेच आमच्या परळी मतदारसंघाकडे लक्ष द्यावे, अशी विनंती देखील मुख्यमंत्र्यांना केली. मुंडे साहेबांच्या संघर्ष पाचवीला पुजलेला, तसा आमच्या कुटुंबालाच संघर्ष पाचवीला पूजलेला असल्याचे धनंजय मुंडेंनी म्हटले. पण मी सावलीसारखं, अगदी पहिल्या संघर्ष यात्रेपासूनचा हा संघर्ष पाहिलेला आहे, असे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

## सरकारी नोकरदारांच्या महागाई भत्त्यात वाढ

### पगार भरभक्कम वाढणार, कधीपासून होणार लागू?

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्क्यांनी वाढ केली आहे. त्यामुळे सध्याचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५५ टक्के झाला आहे. ही वाढ १ जानेवारी २०२५ पासून लागू होणार असून निवृत्ती वेतनधारकांनाही याचा लाभ मिळणार असल्याची माहिती समोर येत आहे. दिवाळीपूर्वी केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास सध्याचा महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढू शकतो.

वाढती महागाई लक्षात घेता सरकारकडून सरकारी कर्मचाऱ्यांना वर्षातून दोनदा महागाई भत्ता दिला जातो. पहिला १ जानेवारीपासून लागू होतो तर दुसरा १ जुलैपासून लागू होतो. मार्चमध्ये जाहीर झालेला भत्ता १ जानेवारीपासून लागू मानला जातो. तर आता जाहीर होणारा भत्ता १ जुलै २०२५ पासून लागू होणार असल्याचे सांगितले जात आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना सरकारकडून महागाई भत्ता दिला जातो तर पेन्शनधारकांना डीआर देण्यात येतो.

## जिजाऊनगर भागातील मागासवर्गीय वस्तीतील रस्ता नाली आणि पाण्याच्या पाईपलाईनसाठी स्वातंत्र्यदिनी आमरण उपोषणाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नवीन वार्ड क्रं.२२ मधील जिजाऊ नगर, जुना धानोरा रोड, नवीन सरस्वती विद्यामंदिर शाळेच्या दक्षिण बाजूस असलेल्या जिजाऊनगर मधील मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्ता, नाली व पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनसाठी स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी अमरण उपोषण करण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

वार्ड क्रमांक २२ जुना वॉर्ड १४ जिजाऊ नगर, जुना धानोरा रोड, नवीन सरस्वती विद्या



मंदिर शाळेच्या दक्षिण बाजूस मागासवर्गीयाची कॉलनी गेली २५ वर्षापासून आहेत. या भागात रस्ता, नाली आणि पिण्याच्या पाण्याची पाईप जोडणी झालेली नाही. ▶▶ पान २ वर

## मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाची जोरदार पूर्वतयारी

### जागोजागी चलो मुंबईचे बॅनर; बैठकांवर भर

जालना । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे २९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनासाठी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात जोरदार तयारी सुरू आहे. या आंदोलनाच्या तयारीसाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी ▶▶ पान २ वर



## ऑनलाईन नोंदणी असेल तरच मंत्रालयात प्रवेश

### १५ ऑगस्टपासून नवी नियमावली, आदेश जारी

मुंबई । प्रतिनिधी

मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना आता केवळ डिजिटल प्रवेश पत्राद्वारेच प्रवेश देण्यात येणार आहे. डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येणार असून १५ ऑगस्टपासून नवी नियमावली लागू होणार आहे.



राजधानी मुंबई हे महाराष्ट्राचे मुख्यालय म्हणता येईल, विधिमंडळ, सचिवालय आणि मंत्रालय या महत्त्वाच्या आणि प्रशासकीय व प्रमुख संस्था मुंबईत आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मंत्रालयात नागरिक, राजकीय नेतेमंडळी, आमदार, खासदार, पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रमुख भेटी देत असतात. स्थानिक आणि जिल्हा पातळीवर आपली कामे रखडल्यानंतर संबंधित व्यक्ती वा संस्था मंत्रालयाचं दार ठोठावत असते. मात्र, आता मंत्रालयाचे दार सहजपणे ठोठावता येणार नाही. मंत्रालयीन प्रवेशासाठी सरकारने आता ऑनलाईन प्रवेश प्रणाली सुरू केली असून डिजी प्रवेश पास ▶▶ पान २ वर

## शेतकऱ्यांचे विविध प्रश्न तातडीने सोडवा

### छावाच्या शिष्टमंडळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे

लातूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लातूर येथे दौऱ्यावर आले असताना विमानतळावर त्यांची अखिल भारतीय छावाचे नेते व शेतकरी नेते विजयकुमार घाडगे पाटील यांनी आपल्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांना भेटून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली तसेच विजयकुमार घाडगे यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या सदर्भात आरोपीविरुद्ध कडक कारवाई करून सीआयडी ▶▶ पान २ वर



## शिक्षकांचे धाबे दणाणले; २०१२ नंतरच्या भरतीची चौकशी होणार

### मंत्री पंकज भोयर यांची माहिती; शिक्षक, शिक्षकेत्तर नियुक्त्या वादाच्या भोवऱ्यात

मुंबई । प्रतिनिधी

बोगस शालार्थ आयडीसह इतर मुद्द्यावर बोगसगिरी करुन भरती झालेल्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. २०१२ नंतर झालेल्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांची आता एसआयटी मार्फत चौकशी करण्यात येणार आहे. गृह आणि शिक्षण विभागाच्या राज्यमंत्री पंकजा भोयर यांनी ही माहिती दिली.

बोगस शालार्थ आयडी काढून राज्यात मोठ्या प्रमाणात शिक्षक भरती झाल्याचे उघड आले आहे. आता या सर्वांची चौकशी होणार असून २०१२ नंतरच्या ▶▶ पान २ वर

## निवडणुक आयोगाच्या विरोधात ३०० खासदार एकवटले

नवी दिल्ली । वृतसंस्था

मतदार यादीतील अनियमिततेविरुद्ध इंडिया ब्लॉकचा निषेध बिहारमध्ये सुरूच आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षाचे खासदार निवडणूक आयोगाकडे मोर्चा काढला होता, परंतु पोलिसांनी त्यांना रोखले असून संसदेपासून अवघ्या काही अंतरावरच खासदारांना अडवण्यात आले.

तब्बल दहा वर्षांनतर संसदेच्या प्रांगणात खासदारांचा एल्गार पाहायला मिळाला. मतचोरी आणि ईव्हीएम मशीनच्या विरोधात आज कॉंग्रेससह विरोधी पक्षातील खासदारांनी एल्गार पुकारला. संसदेपासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत खासदारांनी मोर्चाचं आयोजन केलं. मात्र, पोलिसांनी हा मोर्चा अडवला. त्यामुळे संतप्त झालेल्या खासदारांनी जागेवरच बसून ठिय्या आंदोलन सुरू केलं. जोरजोरात घोषणा देत असतानाच एका महिला खासदाराची प्रकृती बिघडली. त्यामुळे ▶▶ पान २ वर

# मराठ्यांचे शौर्य सांगणारी ती तलवार अखेर परतणार

## लंडनमध्ये जाऊन मंत्री आशिष शेलारांनी घेतली ताब्यात

मुंबई । प्रतिनिधी

नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार रघुजी भोसले यांची महाराष्ट्र सरकारने लिलावात जिंकलेली तलवार लंडन येथे जाऊन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी ताब्यात घेतली.

सोमवारी १८ ऑगस्टला ही तलवार मुंबईत दाखल होणार आहे. रघुजी राजे भोसले यांनी वापरलेली आणि इतिहास घडविणारी तलवार मिळविण्यात सरकारला मोठे यश आले आहे. या तलवारीचा इंग्लंडमध्ये लिलाव करण्यात आला होता. मात्र वेळ फार कमी असतानासुद्धा महाराष्ट्र सरकारने तो लिलाव जिंकला होता. ही तलवार घेण्यासाठी नागपूरचे राजे रघुजी भोसले यांचे वंशज मुधोजी भोसले यांनीसुद्धा याचा पाठपुरावा केला होता. सरकारला यात हस्तक्षेप करण्याची विनंती करण्यात आली होती.

ही तलवार आता महाराष्ट्राच्या ताब्यात आल्यानंतर मुधोजी राजे भोसले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ही तलवार परत आणण्यात यश आले याचा मोठा आनंद नागपूरकरांना झाला आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या



आहेत. तसेच ही ऐतिहासिक तलवार नागपुरात यावी आणि नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात ठेवण्यात यावी किंवा भोसले घराण्याच्या स्वाधीन ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.०० क्विंटल | २,३४० | २,७४६ | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ५६.०० क्विंटल | २,०५० | २,६०१ | २,३८७ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,४०१ | २,७३० | २,६०० |
| मुग: २.५० क्विंटल | ६,४११ | ६,९१० | ६,६६० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ४,९०० | ६,१०१ | ५,५४६ |

cmyk

## अग्रलेख

# तिढा सुटता सुटेना!

भारत आणि अमेरिकेमध्ये सुरू असलेला व्यापार करारासंबंधीचा तिढा अद्याप सुटलेला नाही उलट त्यासंबंधीचा गुंता वरचेवर वाढतच चालला आहे. त्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताबरोबर कोणताही व्यापार करणार नसल्याचे सांगून तेल ओतण्याचेच काम केले आहे. जोपर्यंत आयात शुल्काचा मुद्दा सुटत नाही, तोपर्यंत भारतासोबत कोणतीही चर्चा होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. अमेरिकेने सध्या भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावले आहे.

भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने हे शुल्क लागू करण्यात आले. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ट्रम्प म्हणाले, जोपर्यंत आयात शुल्काचा मुद्दा सुटत नाही, तोपर्यंत व्यापार करारावर चर्चा करणार नाही. ट्रम्प यांनी हा खुलासा करण्याआधी एक दिवस व्हाईट हाऊसने एक कार्यकारी आदेश लागू केला होता. यात रशियासोबत व्यापार केल्यामुळे भारतावर अतिरिक्त २५ टक्के शुल्क लावण्याची घोषणा केली होती. भारताने रशियाकडून तेल खरेदी करून आणि ते मोठ्या नफ्यावर आंतरराष्ट्रीय बाजारात विकून रशियाच्या अर्थव्यवस्थेला मदत करणाऱ्या देशांना रोखणे आणि रशियाला त्याच्या आक्रमकतेसाठी गंभीर परिणाम भोगायला लावणे हा आहे. अमेरिकेने ५० टक्के शुल्क लावल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, भारतातील शेतकऱ्यांच्या हितासाठी आर्थिक परिणाम भोगावे लागले तरीही, भारत कधीही तडजोड करणार नाही.

शेतकऱ्यांचे हित ही आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे. यासाठी मोठी किंमत मोजावी लागेल हे मला माहीत आहे आणि मी त्यासाठी तयार आहे. भारत त्यासाठी तयार आहे. अमेरिकेशी संबंध ताणले गेल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियन अध्यक्ष ब्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवर संवाद साधला. या चर्चेत दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याचा निर्धार मोदी यांनी व्यक्त केला. या चर्चेबाबत मोदींनी सोशल मीडियावर माहिती दिली. मोदी म्हणाले की, माझे मित्र पुतिन यांच्याशी अत्यंत चांगली आणि सविस्तर चर्चा झाली. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या २३व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी पुतिन यांचे स्वागत करण्यास आपण उत्सुक आहोत. युक्रेनविरुद्धच्या संघर्षाबाबत भारताची भूमिका स्पष्ट करताना मोदी म्हणाले, भारत या संघर्षाचे शांततापूर्ण निराकरण करण्याच्या बाजूने आहे. भारताने रशिया आणि युक्रेनला चर्चेतून हा संघर्ष संपवण्याचे आवाहन केले आहे.

दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय अजेंड्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि भारत-रशिया यांनी धोरणात्मक भागीदारी अधिक वाढवण्याचा संकल्प केला. ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंच्या आयातीवरील टॅरिफ २५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. पहिल्या टप्प्यात ७ ऑगस्टपासून २५ टक्के टॅरिफ लागू करण्यात आले, तर दुसऱ्या टप्प्यात २७ ऑगस्टपासून अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लागू केले जाणार आहे. अमेरिकेचा हा निर्णय एकतर्फी असल्याचे भारताने म्हटले आहे. रशियाशी व्यापार संबंध असणाऱ्या देशांवर दुहेरी निर्बंध लादण्याचा इशारा ट्रम्प यांनी याआधी दिला होता. इतर देशही रशियाकडून तेल खरेदी करत असताना केवळ भारतालाच का लक्ष्य केले जात आहे, असा प्रश्न त्यांना करण्यात आल्यानंतर भारताबाबत त्यांनी नवीन वक्तव्य केले आहे. ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे की, भारतासोबतची द्विपक्षीय व्यापार चर्चा थांबविण्यात आली आहे.

५० टक्के टॅरिफ लागू करण्याच्या घोषणेनंतर भारतासोबत द्विपक्षीय वाटाघाटी वाढतील का असा प्रश्न पत्रकारांनी केला असता ट्रम्प म्हणाले, जोपर्यंत आम्ही तोडगा काढत नाही तोपर्यंत नाही. भारत-पाक युद्ध झाले तेव्हा अमेरिका थेट सहभागी झाली आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी दोन अण्वस्त्रधारी शेजाऱ्यांमध्ये शांतता प्रस्थापित केली, असा दावा अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबिया यांनी केला. ते म्हणाले, ट्रम्प हे शांततेसाठी कटिबद्ध आहेत म्हणूनच आम्ही भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध झाले तेव्हा थेट सहभागी होऊन हे युद्ध थांबवले. त्यामुळे भारतीय उपखंडात शांतता प्रस्थापित झाली. अमेरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लावल्यानंतर भारताने आता त्याबाबत ताठर भूमिका घेतली आहे. अमेरिकेकडून भारताने शस्त्र खरेदी बंद केल्याचे वृत्त 'रॉयटर्स'ने दिल्याने मोठी खळबळ उडाली आहे. भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह हे पुढील आठवड्यात संरक्षण करारासाठी अमेरिकेला जाणार होते. मात्र, त्यांनी हा दौराही रद्द केला आहे. 'रॉयटर्स'ने तीन भारतीय अधिकाऱ्यांचा हवाला देत हे वृत्त दिले आहे.

मात्र, भारत सरकारने हे वृत्त फेटाळले असून ते चुकीचे व खोटे असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेकडून शस्त्रास्त्र खरेदी पहिल्यासारखीच सुरू असल्याचेही म्हटले आहे. ट्रम्प यांच्या 'टॅरिफ बॉम्ब'नंतर अमेरिकेतील कंपन्या भारतीय वस्तूंच्या आयातीबाबत काय निर्णय घेणार याची भारतीय निर्यातदारांना चिंता वाटत होती. आपल्या ऑर्डर्सवर परिणाम होईल असे त्यांना वाटत होते. नेमके तेच झाले आहे. वॉलमार्ट, ॲमेझॉन, टार्गेट, गॅप या कंपन्यांनी भारतातील त्यांच्या ऑर्डर्स रोखल्या आहेत. या निर्णयाचा भारतीय कापड उद्योगावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे एकूण खर्चात ३० ते ३५ टक्के वाढ होईल. तसेच अमेरिकेतून येणाऱ्या ऑर्डर्समध्ये ४० ते ५० टक्के घट होईल. तज्ज्ञांच्या मते यामुळे ३५ ते ४३ हजार कोटी रुपयांचे नुकसान होऊ शकते. अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या भारतीय वस्तूंच्या किमती ३० ते ३५ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे.

---

# ॲड.सुभाष पिसोरे यांची वकील संघाचे अध्यक्षपदी निवड



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक आज पार पडली. या निवडणुकीमध्ये अध्यक्षपदी ॲड. सुभाष पिसोरे, उपाध्यक्ष ॲड. रघुराज देशमुख, सचिव ॲड. सुभाष काळे, सहसचिव ॲड. धीरज कांबळे, कोषाध्यक्ष ॲड. योगेश टेकाळे ग्रंथपाल सचिव ॲड. सय्यद अजीम आणि महिला प्रतिनिधी पदी ॲड. मनीषा गडकर कुपकर या विजय झाल्या.

दोन पॅनल मध्ये प्रामुख्याने ही निवडणूक पार पडली. सुभाष पिसोरे यांचे पॅनलचे सर्व उमेदवार यात मोठ्या फरकाने विजयी झाले. जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीमध्ये काम पाहिलेले निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र किर्दात, निरीक्षक ॲड. पी. ए. हुंबे, ॲड. सुनंदा जाधव तसेच ॲड. सुधीर जाधव ॲड. उमेश धांडे, ॲड. रमेश राऊत, ॲड. अभिजीत डोंगरे, ॲड. लिंबा लाखे, ॲड. सदानंद वाघमारे ॲड. अजित देशमुख यांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडली.

## स्थानिक आमदाराच्या दुर्लक्षामुळे; घनसावंगी तालुक्यात युरिया खताचा आता कृत्रिम तुटवडा

जालना । प्रतिनिधी

**घनसावंगी विधानसभेचे आमदार यांच्या दुर्लक्षामुळे घनसावंगी तालुक्यात खत टंचाई निर्माण झालीअसे शेतकऱ्याकडून बोलल्या जात आहे. स्थानिक आमदारांनी तत्काळ लक्ष ना दिल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता आहे.**

घनसावंगी तालुक्यात मागील काही दिवसांपासून समाधानकारक पाऊस होत असल्याने खरीप हंगामातील पिके आता बहरात आली आहेत. तालुक्यात ८८ हजार हेक्टरवर खरीपाच्या पेरण्या झाल्या असून सुमारे ४९ हजार हेक्टरवर कपाशी आणि २५ हजार ७६४ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून या नगदी पिकांसाठी रासायनिक खतांच्या मागणीत मोठी वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर खतांची विशेषतः युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करून खत विक्रेते जादा दराने युरिया खताची विक्री करीत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. युरिया खताच्या एका गोणीसोबत पूरक खते घेण्याची सक्ती विक्रेत्यांकडून केली जात आहे. घनसावंगी तालुक्यात मे महिन्यात अवकाळी तसेच अतिवृष्टी आणि जूनमध्ये काही प्रमाणात पाऊस झाल्यानंतर पावसाने सुमारे काही दिवसानंतर विश्रांती घेतली. मात्र नंतर मोसमी पावसाने साथ दिल्याने खरीप हंगामातील कपाशी, सोयाबीन, तूर, मूग, बाजरी, मका या पिकांची वाढ चांगल्या प्रमाणात झाली आहे. कृषी चालक केंद्र मालकाशी व कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, कृषी मंडळ अधिकारी यांच्या संगणमताने खताचे टंचाई होत असल्याचे बोलल्या जात आहे. कोणत्याही कृषी चालकांनी युरिया तसेच इतर खतासाठी शेतकऱ्यांकडून आगाऊ पैसे घेऊ नयेत. शेतकऱ्यांनी विक्रेत्याकडून पक्के बिल घ्यावे.

## मराठवाडा स्तरीय सुगम गायन स्पर्धेत बीडचा देव मुळे व जान्हवी देशपांडे ठरले विजयाचे मानकरी



बीड । प्रतिनिधी

कै.शारदाबाई देशमुख स्मृती प्रित्यर्थ मराठवाडा स्तरीय सुगम गायन स्पर्धा संभाजीनगर येथे आयोजित केली होती त्या स्पर्धेमध्ये बीडचा छोट्या गटातचि.देव दीपक मुळे तृतीय क्रमांक व मोठ्या गटातकु.जान्हवी गिरीश देशपांडे उत्तेजनार्थ प्रथम क्रमांकाने यश मिळवले. पं.विजयजी देशमुख व श्री केदार देशमुख हे यांच्या संकल्पनेतून अत्यंत दर्जेदार स्पर्धेचे नियोजन केले जाते मराठवाड्यातील अत्यंत उत्तम स्पर्धक या स्पर्धेला हजेरी लावतात. ज्येष्ठ हार्मोनियम वादक प. विश्वनाथ जी कान्हेरी व पं.विश्वनाथ ओक यांच्यातर्फे त्यांना बक्षीस प्रदान करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर पंडित गिरीशजी जोशी डॉ.संजय पाटील देवळाणकर ज्येष्ठ पत्रकार महेशजी वाघमारे श्री.प्रशांतजी सुलाखे श्री.संतोषजी मानूरकर पं.प्रकाशजी मानूरकर श्री.भरत अण्णा लोळगे सुदर्शन जी धुतेकर तबलावादक केदारजी चव्हाण सर श्री अमरजी डागा श्री.वासुदेव जी काजळे तबलावादक नरहरी दळे व स्वरांग संगीत विद्यालयाचे संचालक श्री नामदेव हरिभाऊ साळुंके यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



दिंद्रुड : १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने दिल्ली येथे लाल किल्ल्यावर ध्वजारोहण कार्यक्रमासाठी सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्रातील सात सेवा सहकारी सोसायटी ची निवड करण्यात आली. आहे यामध्ये बीड जिल्ह्यातून नित्रुड सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन कॉम्रेड सुभाष (अण्णा) डाके यांची निवड करण्यात आलेली आहे, त्यानिमित्त त्यांचा सत्कार खोलेश्वर मल्टीस्टेट च्या वतीने करण्यात आला.

# तिसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त बेलेश्वर मंदिरात कीर्तनसेवा

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून बेलेश्वर मंदिर या ठिकाणी तिसऱ्या सोमवारी होणारा उत्सव त्यानिमित्त ह भ प भागवताचार्य नीलकंठ महाराज तावरे संस्थापक अध्यक्ष श्री संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ वारकरी शिक्षण संस्था यांची सुंदर अशी कीर्तन सेवा झाली. शिव भोळा चक्रवर्ती त्याचे पाय माझे चित्ती या अभंगावर निरूपण करत असताना भगवंताचं नामस्मरण केल्यानंतर मानवी जीवनामध्ये काम क्रोधलो मध मच्छर अहंकारा दि जे विकार आहेत ते संपूर्ण विकार भगवंताच्या नामस्मरणाने शुद्ध अंतकरणाने केलेल्या सेवेतून विकार नष्ट होतात म्हणून जीवन जगत असताना शुद्ध अंतकरणाने भक्ती करा भक्ती थोडी करा पण शुद्ध भावनेने करा मानवी जीवन परोपकारासाठी मिळालेलं आहे भागवत प्राप्तीसाठी मिळालेलं आहे भगवतप्राप्तीमध्येच मानवी जीवनाची इती कर्तव्यता आहे त्याकरता धर्म अर्थ काम मोक्ष हे चार पुरुषार्थ यासंदर्विहाने मिळवता येतात म्हणून माणसाने कोणाला त्रास होईल आपल्यापासून कोणाचं वाईट होईल





असं वागू नये सामान्य घटक पक्षाचे आहेत गोरगरीब लोक जे आहेत त्यांना मदत करणे हाच मोठा धर्म आहे संतांनी देखील आपल्याजवळ जे होतं ते समाजाच्या उपयोगाकरिताच खर्च केलं म्हणून प्रत्येकाने आपल्याजवळ ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या गोष्टी धन असेल ज्ञान असेल हे समाजाकरिता काही अंशी तरी खर्च करावा संतांनी स्वतः अनुभव घेऊन स्वतः करून जगाला ते करायला सांगितले आहे म्हणून आपण संतांनी सांगितलेल्या मार्गाने जाऊ याने नक्कीच आपल्याला भगवान परमात्मा प्राप्त होईल अशा प्रकारचे प्रतिपादन आष्टी येथील बेलेश्वर मंदिर समस्त रेडेकर कंपनी पंचक्रोशीतील सर्व मंडळी सुंदर असं मंदिर भव्य अशा प्रांगणामध्ये कार्यक्रम प्रसंगी ह भ प भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे बोलत होते त्यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून पुरोपकारी जीवन जगा कोणालाही त्रास देऊ नका आळंदी पंढरीची वारी करा आई-वडिलांची सेवा काही नेवाचिनी मनाने करा होईल तेवढा परोपकार जीवनामध्ये करा व भगवत कृपा संपादन करा असेही प्रतिपादन ह भ प भागवताचार्य नीलकंठ महाराज तावरे यांनी केलं त्याप्रसंगी प्रस्ताविकश्री शरद रेडेकर पत्रकार यांनी केले देविदास धस म्हणाले की तवलवाडी रोड वरील बेलेश्वर महादेव मंदिरात श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित भंडारा कार्यक्रम ज्येष्ठ नेते माजी जि प. सदस्य देविदास आबा धस यांनी उपस्थित राहुन भाविक भक्तांना समाजाचे निती मूल्य जपा तसेच आई-वडिलांचा सांभाळ करा मुलींनी आपल्या आई-वडिलांची शर्मिने मान झुकवून देऊ नका असे वागू नका असा संदेश दिला. तसेच रेडेकर परीवारातील जेष्ठ स्व माजी जि प. सदस्य रेडेकर गुरुजी यांच्या जुन्या आठवणीनां उजाळा दीला गुरुजींचे ब्रीद वाक्य होते निष्ठेने काम म्हणजे यशाचा मार्ग याप्रमाणे वागले त्यामुळेच त्यांचे नाव निघत आहे या पुढच्या पिढीने देखील त्यांच्या नीती मूल्याचे पालन करून त्यांनी सांगून दिलेल्या निष्ठेने काम म्हणजे यशाचा मार्ग या ब्रीद वाक्याचे पालन करून समाजात वागावे असा देखील सल्ला रेडेकर परिवारातील इतर सदस्यांना दिला रेडेकर परिवारातील माता माऊलींचे दर्शन घेतले.कीर्तनाला साथ करणारे सुदाम महाराज बोराडे विठ्ठल महाराज तावरे श्री संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ संस्थेतील सर्व विद्यार्थी मृदुंगाचार्य प्रशांत महाराज ससाने आदी सर्वच मंडळी उपस्थित होते यावेळी आजिनाथ सानप,बलभीम रेडेकर, रेडेकर सर विष्णु रेडेकर,ज्योतिबा रेडेकर रामकाका मुळे, रामदास मुळे,राजु मुळे, रावसाहेब देशमुख ,नवसुपे साहेब, अजित मुळे गायकवाड शिकरे, मुळे पान के, टेकडे,नवसुपे,धोंडे, आदी शिवारकरी यांनी परिश्रम घेतले शेकडो भाविकांनी कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

---

## पान १ वरून...

### पिकविम्याचे ३९००

दुसऱ्या हप्त्याची रक्कम देखील लवकरच जमा केली जाईल, अशी माहिती देण्यात आली आहे. दरवर्षी सुमारे ४ कोटी शेतकरी या योजनेत नोंदणी करतात, आणि आतापर्यंत २३ कोटींहून अधिक शेतकरी या योजनेत सामील झाले आहेत.

------------

### मुंडे साहेबांनाच मुख्यमंत्री

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझ्यासारखे असंख्य कार्यकर्ते घडवले ते आपल्या सर्वांचे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या पावनस्मृतींना अभिवादन करतो. मी माझे भाग्य समजतो की, येथील पुतळा अनावरण सोहळा माझ्या हस्ते झाला. स्व. विलासराव देशमुख यांचा पुतळा त्याच ठिकाणी आहे, स्व. गोपीनाथराव मुंडे आणि विलासराव देशमुख यांची मैत्री संपूर्ण राज्याला माहिती आहे. आज त्यांचे पुतळे एकमेकांच्या आजूबाजूस आहेत, हे वेगळेपण आहे असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरमधील पुतळा अनावरण सोहळ्यात भाषणाला सुरुवात केली. आपल्या भाषणात गोपीनाथराव मुंडेंचा संघर्ष आणि आठवणी सांगत २०१४ च्या निवडणुकीवेळचा किस्साही मुख्यमंत्र्यांनी सांगितला. राज्यात काम केलेले नेते दिल्लीत गेले तर हरवून जातात. मात्र, लोकसभेत अवघ्या काही दिवसांत मुंडेसाहेबांनी त्यांचे काम दाखवले होते. पण, त्यांना तेथे काम करण्याची संधी मिळाली नाही. गोपीनाथराव मुंडेंनीच देशात नरेंद्र, राज्यात देवेंद्र असा उल्लेख केला होता. मात्र, सत्ता आल्यावर आम्ही त्यांनाच मुख्यमंत्री करणार होतो. मोदींना उधारीवर मुंडे साहेबांना दिले होते. आम्ही त्यांना परत आणणार आणि मुख्यमंत्रिपदावर बसवणार हे मी त्यावेळी म्हणायचो. पण, दुर्दैवाने ते शक्य होऊ शकले नाही असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले. यावेळी मंत्री जयकुमार गोरे, मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचीही भाषणे झाली. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने मुंडे प्रेमी उपस्थित होते.

-------------

### ऑनलाईन नोंदणी असेल तरच

असल्याशिवाय तुम्हाला मंत्रालयात एंट्री मिळणार नाही. मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना आता केवळ डिजिटल प्रवेश पत्राद्वारेच प्रवेश देण्यात येणार आहे. डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येणार आहे. येत्या १५ ऑगस्टपासून ही नवी कार्यप्रणाली लागू केली जात आहे. अभ्यागतांकडे मंत्रालयात प्रवेश मिळविण्यासाठी आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड आदी शासन मान्य ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशिक्षीत तसेच स्मार्टफोन नसलेल्या अभ्यांताकरीता गार्डन गेट येथे ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेश नोंदणीकरीता तसेच मदतीकरीता एक खिडकी उपलब्ध असणार आहे. त्यामुळे, आता मंत्रालयात यायचं असेल तर नागरिकांना डिजिटल व्हावे लागणार आहे. ११ ऑगस्ट रोजी महाराष्ट्राच्या गृह विभागाने यासंदर्भात आदेश जारी केला आहे. त्यानुसार, यापूर्वी कार्यान्वित करण्यात आलेली मॅन्युअली प्रवेश पास देण्याची पद्धत बंद करण्यात आली आहे.

-----------

### मनोज जरांगे पाटलांच्या

'चलो मुंबई' अशा आशयाचे बॅनर लावण्यात आले आहेत. जिल्ह्यातील गावोगावी सखल मराठा बांधवांच्या वतीने जनजागृतीसाठी बैठका घेण्यात येत आहेत. रिक्षा आणि फोर व्हीलरला बॅनर लावण्यासाठी बॅनर प्रिंट केले जात आहेत. २७ ऑगस्टला सर्वच जिल्ह्यातून अंतरवली सराटीकडे आंदोलनासाठी मोठ्या संख्येने मराठा बांधव रवाना होणार आहेत.

-----------

### जिजाऊनगर भागातील मागासवर्गीय

या मागणीसाठी अनेक वर्षापासून नगर परिषदेस पाठपुरावा करण्यात येत आहे. या भागातील नगरसेवकांकडेही वारंवार पाठपुरावा केला आहे. नगर परिषदेमध्ये सक्रिय असलेल्या पदाधिकाऱ्यांकडे अनेक वेळा पाठपुरावा केलेला आहे. मागासवर्गीयाच्या वस्त्यांच्या विकासांतर्गत्? दलित उत्थान योजनेच्या निधीचा नगर परिषदेने नियमबाह्यरित्या पात्र नसलेल्या भागासाठी वापरला आहे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या भागातील नागरीकांना असेही कळाले आहे की, या भागातील रस्ता, नाली आणि पाईलाईनचे काम कागदावर दाखवून बोगस बिले नगर परिषद प्रशासनाने उचललेले आहेत. याबाबतची उच्चस्तरीय चौकशी समितीमार्फत जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावी, अशी मागणी या भागातील नागरिकांची केली आहे. दि. १४ ऑगस्ट पर्यंत या भागातील रस्ता,नाली आणि पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन जोडणीचे काम सुरू करावे, यासाठी जिल्हाधिकारी,बीड, मुख्याधिकारी नगर परिषद, बीड यांना दि.१६/०१/२०२५ रोजी निवेदन देवून मागणी करण्यात आलेली आहे. परंतु प्रशासनाने अद्यापपर्यंत मागणीकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे स्वातंत्रदिनी दि.१५ ऑगस्ट रोजी या भागातील नागरीकांना अमरण उपोषण करण्याची वेळ आलेली आहे. ही बाब अत्यंत दुर्देवी आहे. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यदिनी या भागातील मोठया संख्येने नागरीक, महिला, जेष्ठ नागरीक आणि लहान मुले यासह सर्व कुटूंबासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास करणार आहेत. यामध्ये वृध्द नागरिक, लहान बालके, महिला यांना काही त्रास झाल्यास किंवा त्यांच्या जीवाला काही धोका निर्माण झाल्यास त्यास सर्व संबंधीत प्रशासन जबाबदार राहील यांची नोंद घ्यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी आमरण उपोषणास मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन या भागातील नागरिकांनी केले आहे. निवेदनावर चोपडे गौतम, वाघमारे विलास, सुहन गायकवाड, श्री.राहुल जाधव, श्री.अनिली खळगे, वसंत सरवदे, जगताप मोहनराव, वीर शरद, बाळासाहेब वाघमारे,दिपक सरवदे यासह परिसरातील इत्तर नागरीकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

-----------

### शिक्षकांचे धाबे दणाणले; २०१२

सर्व शिक्षक, शिक्षकेतर यांच्यासह ज्या काही नियुक्त्या झालेल्या आहेत या सगळ्याची चौकशी आता एसआयटी मार्फत करण्यात येईल, असे मंत्री पंकज भोयर यांनी स्पष्ट केले. या घोषणेमुळे राज्यभरातील २०१२ नंतर शिक्षक म्हणून नोकरी मिळवणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या चौकशीमुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या शिक्षक भरतीतील अनियमितता आणि गैरव्यवहार समोर येण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकतेला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

----------

### शेतकऱ्यांचे विविध प्रश्न

चौकशी लावावी असे निवेदनाद्वारे व चर्चेद्वारे मुख्यमंत्र्यांना सांगितले. शेतकऱ्यांचे प्रश्न गांभीर्याने सोडवण्याचे आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्वरित सरसकट कर्जमाफी करावी, सोयाबीन पिकासाठी यावर्षी प्रतिक्विंटल साडेआठ हजार रुपये पायाभूत दर ठरवून खरेदी करावी, कापसाला प्रति क्विंटल दहा हजार रुपये दर द्यावा, पिक विम्याचे मागील वर्षाचे आणि चालू वर्षाचे दोन्ही हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर महिन्याभरात जमा करावे, शेतकऱ्यांना बंद असलेले थ्री फेस कनेक्शन देण्याचे त्वरित चालू करावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना छावाच्या शिष्टमंडळाने विजयकुमार घाडगे यांच्या नेतृत्वात दिले तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा सुद्धा केली. तसेच विजयकुमार घाडगे यांच्यावर झालेल्या हल्ल्या संदर्भात सुद्धा चर्चा झाली. या प्रकरणात सीआयडी चौकशी लावून आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. वरील सर्व विषयावर मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे शांतपणे ऐकून या सर्व बाबींवर त्वरित कारवाई करण्यासाठी संबंधितांना तातडीने सूचना केल्या. यावेळी अखिल भारतीय छावाचे शेतकरी नेते विजयकुमार घाडगे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळात अखिल भारतीय छावाचे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष अशोक मोरे पाटील, बीड जिल्हाध्यक्ष अशोक रोमन, नांदेड जिल्हाध्यक्ष माधवराव ताटे, जालना जिल्हाध्यक्ष संदीप ताडगे, लातूर जिल्हाध्यक्ष दीपक नरवडे, यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

------------

### मराठ्यांचे शौर्य सांगणारी ती

करावी ही मागणीही त्यांनी केली आहे. तलवार राज्यात येणार याचा जल्लोष सरकार तर करेलच पण भोसले घराणेसुद्धा मोठा जल्लोष करणार आहे, असेही त्यांनी सांगितले आहे. ही तलवार महाराष्ट्रात परतल्यामुळे सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे. सरदार रघुजी भोसले यांची तलवार. ही तलवार आता महाराष्ट्रात येणार आहे.

------------

### निवडणुक आयोगाच्या विरोधात

वातावरण अधिकच तापले होते. मात्र, त्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सर्व खासदारांना पुन्हा एकदा संसदेत नेऊन सोडले. राहुल गांधी, प्रियांका गांधी, शरद पवार, सुप्रिया सुळे, अखिलेश यादव, जयराम रमेश, संजय राऊत यांच्यासह अनेक खासदार या मोर्चात सहभागी झाले होते. मात्र या मोर्चाला परवानगी नसल्याचे सांगत संसदेपासून अवघ्या काही अंतरावरच पोलिसांनी हा मोर्चा अडवला.त्यावर राहुल गांधी आणि पोलिस अधिकाऱ्यांमध्ये जोरदार वाद झाला.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात....

### पाण्याची बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

जलनायक मयंक गांधी संस्थापित ग्लोबल विकास या संस्थे अंतर्गत चालणाऱ्या सिरसाळा येथे सोमवारी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. माजलगाव तालुक्यातील साळेगाव येथील १३९ महिला आणि पुरुषांनी पाण्याची बचत, जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, शाश्वत उत्पन्न वाढीसाठी आधुनिक शेती, फळबाग लागवड तंत्र आदींचे त्यांनी धडे घेतले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून या गावाला आगामी काळात सुधारणांच्या दृष्टीने आवश्यक अशी कामे आणि मदत करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने गावातील प्रत्येक नागरिक त्या कामाशी अवगत होऊन एकरूप झाला पाहिजे. सोमवारी झालेल्या कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी यांचीही उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले.पाण्याची बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी या विचारांना अनुसरून साळेगाव गावातील १३९ महिला व पुरुष शेतकऱ्यांनी कृषिकूल, सिरसाळा येथे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला. जलनायक मयंक गांधी यांच्यासह ग्लोबल विकास ट्रस्टच्या प्रशिक्षक टीमकडून जलसंधारण, पाणलोट व्यवस्थापन, जलबचततंत्र, फळबाग लागवड आणि उत्पादनवाढीच्या आधुनिक पद्धती याबाबत त्यांना सखोल मार्गदर्शन मिळाले. तसेच पाणलोट व्यवस्थापन कक्ष, कृषी यांत्रिकीकरण कक्ष, ग्लोबल विकास ट्रस्ट प्रवास कक्ष, कीटक संगोपन गृह आणि माती प्रयोगशाळा यांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतील नव्या तंत्रज्ञानाची ओळख झाली. हा कार्यक्रम शेतकऱ्यांच्या शाश्वत शेती प्रवासातील एक प्रेरणादायी पाऊल ठरला.

### बीड जिल्हाध्यक्षपदी भाऊसाहेब हंगे तर सचिवपदी राहुल सुपेकर



बीड । प्रतिनिधी

कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या जिल्हाध्यक्षपदी भाऊसाहेब हंगे यांची तर जिल्हा सचिव पदी राहुल सुपेकर यांची निवड विश्रामगृह बीड येथील आयोजित बैठकीत करण्यांत आली .

याबाबत अधिकृत वृत्त असे की शासकीय विश्रामगृह बीड येथे कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाली . बैठकीच्या अध्यक्षस्थानी विभागीय अध्यक्ष डी. एस . वाघमारे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य अध्यक्ष :अनिल जाधवर व राज्य उपाध्यक्ष प्रकाश अहिरे हे होते . यावेळी भाऊसाहेब हंगे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली . भाऊसाहेब हंगे हे कास्ट्राईब मधील परखड लढाऊ व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात . यापूर्वी त्यांनी नवजीवन शिक्षक पतसंस्थेत संचालक म्हणून तसेच संघटनेचे पंधरा वर्षे जिल्हाध्यक्ष म्हणून काम केलेले आहे .त्यांच्या अनुभवाचा संघटनेला निश्चितच फायदा होईल. नूतन जिल्हा सचिव राहुल सुपेकर हे अत्यंत अभ्यासू व झुंजार नेतृत्व म्हणून जनमानसात परिचित आहेत . त्यांच्या निवडीमुळे संघटना गतिशील होऊन कार्यप्रवण होणार आहे . जिल्हा उपाध्यक्षपदी हकिम मणियार यांची निवड करण्यात आलेली असून शासन निर्णयाचे ते विशेष जाणकार आहेत .तसेच शिक्षकांचा प्रश्न हिरारिने सोडवण्यात त्यांचा हातखंडा आहे. याचबरोबर बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झालेले झुंबर गव्हाणे हे लढाऊ नेतृत्व असून संघटनेतील कार्याचा त्यांना अनुभव असून अन्यायग्रस्त शिक्षकांवरील अन्याय दूर करण्यात, शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यात ते सतत आघाडीवर असतात . जिल्हा सहसचिवपदी डॉक्टर जलील शेख सर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे . जलील सर यांनी यापूर्वी कास्ट्राईब मध्ये उर्दू विभाग जिल्हाप्रमुख म्हणून कार्य केलेले आहे . अनेक अन्यायग्रस्त शिक्षकांना न्याय दिलेला असून अत्यंत प्रखर लढाऊ असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे .

### शहरातील नाल्यासफाई जोरात सुरू


बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड शहरामध्ये फेरफटका मारून बऱ्याच ठिकाणी पडलेले कचऱ्याचे ढिग पाहिले. यावेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना बोलावून हे ढिग तात्काळ उचला आणि सर्व नाल्यांची सफाई करा, शहरात मला घाण चालणार नाही असा सज्जड दम दिल्याने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी आपली यंत्रणा कामाला लावली असून छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल परिसरामध्ये सफाईचे काम जोरदार सुरू केले आहे.

# आ.धस यांनी केली भगवान रामेश्वराची महापूजा

### लाखो भाविकांनी घेतले भगवान रामेश्वराचे दर्शन





**बीड । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे डोंगरदरीमध्ये असलेल्या भगवान रामेश्वराची तिसऱ्या सोमवारी आष्टी-पाटोदा- शिरूर चे आमदार सुरेश धस यांनी महापूजा केली. यावेळी पूजेला सौताडाचे सरपंच बाळू घुले, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप काका जाधव हेही उपस्थित होते. ही पूजा येथील पुरोहित पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा यांनी केली.**

बीड जिल्ह्यामध्ये बीड -नगर रोडवर पाटोदा तालुक्यामध्ये सौताडा हे गाव आहे. या ठिकाणी असलेल्या डोंगरदऱ्याच्या कपारीत सुंदर असे भगवान रामेश्वराचे मंदिर आहे. या ठिकाणी मोठा धबधबा असल्याने आणि वनविभागाने हा परिसर विकसित केल्याने अत्यंत सुंदर आणि रमनिय असे हे ठिकाण बनले आहे. या ठिकाणी दर श्रावण सोमवारी यात्रा भरते. श्रावण महिन्यातील तिसरा सोमवार हा विशेष असतो. सोमवारी सकाळी सहा वाजता आष्टी-पाटोदा-शिरुरचे आमदार सुरेश आण्णा धस, सौताड्याचे सरपंच बाळू घुले, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप काका जाधव यांनी भगवान रामेश्वराची महापूजा केली. या पूजेचे पोरोहित्य या देवस्थानचे प्रमुख पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा यांनी केले. यावेळी भाविकांनी दर्शनाला गर्दी केली होती. सोमवारी दिवसभर हा परिसर भाविकांनी फुलून गेला होता. या निसर्गरम्य ठिकाणी एरवी ही पर्यटकांची गर्दी असते. सोमवारी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. पोलीस विभागाकडून या ठिकाणी मोठा बंदोबस्त लावला जातो. याशिवाय वनविभागाच्या अधिकारी आणी कर्मचारी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तैनात असतात. सोमवारी सौताडा येथे भगवान रामेश्वराचे लाखो भाविकांनी दर्शन घेतले माझा बळीराजा सुखी कर अशी प्रार्थना यावेळी आ. सुरेश धस यांनी भगवान रामेश्वराकडे केली.

## भ्रष्टाचारी व कलंकीत मंत्र्यांना न हाकल्यास त्यांना शिवसैनिक रस्त्यावर फिरु देणार नाहीत -वरेकर

बीड । प्रतिनिधी

पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायजी राऊत साहेब, संपर्कनेते सुनिलजी प्रभू साहेब, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब,व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, उपजिल्हाप्रमुख रामराजे निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले, जय भवानी, जय शिवाजी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो,



उद्धवसाहेब तुम आगे बढो , कलंकित मंत्री यांची हकालपट्टी झालीच पाहिजे, महाराष्ट्र सरकार हाय हाय अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिक देत होते यामुळे हा परिसर शिवसेनामय झाला होता.यावेळी सर्व मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी सांगितले की, हे महाराष्ट्रातील सरकार वोटिंग मशीनमध्ये घोळ करून, मतदारांना विविध आमिष दाखवून भ्रष्टनितिने सत्तेवर बसलेले आहे , मंत्रिमंडळात ज्यांना घेतले आहे,त्यांची वागणूक उभ्या महाराष्ट्राने बघितले आहे, चड्डी बनियानवर विधान भवनातील सवयंपाक करणार्या कर्मचाऱ्यांना मारहाण करणे, विधानभवनात मंत्र्यांनी रम्मी खेळणे , सिगारेट ओढणे हे काय चाललंय किती माज चढलाय या मंत्रायाला , दिवसाढवळ्या महाराष्ट्रात खुश पांढले जातात , महिलांवर बलात्कार होत आहेत कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र हे बंद न झाल्यास यापुढे उद्धव साहेब यांच्या आदेशानुसार शिवसैनिक यांना रसत्यावर फिरु देणार नाहीत असे त्यांनी सांगितले या आंदोलनाला उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके,तालुका संघटक कलिम शेख ,तालुकसहसचिव संदिप भानप, युवा नेते मुकेश घुमरे, सर्कल प्रमुख अशोक खांडे उपतालुकाप्रमुख अशोक सगळे , ज्ञानेश्वर सिंघन, रामा जाधव, बाळासाहेब वरेकर, विनोद कुटे ,आदेश कुटे ,बाबु कुटे, गोरख नरनाळे,इस्माईल शेख, शेख इरफान, भिमराव तबके ,भरत खरात, विशाल शिंदे, ओमकार गोरे ,बाळु वैध ,करणं लांडगे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### राखी बांधण्यासाठी

धोका वाढतो. काही महिन्यांपूर्वीही याच ठिकाणी अशाच प्रकारचा अपघात झाला होता.घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक मछिंद्र सुरवसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश राठोड आणि सहाय्यक उपनिरीक्षक बाबासाहेब जऱ्हाड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहावर कापड झाकण्यात आले आणि बस बाजूला घेण्यात आली. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. पोलिसांनी तत्परतेने दुसऱ्या बाजूने वाहतूक सुरू करून अडथळा दूर केला. मृतदेह खासगी वाहनाद्वारे शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### संताच्या सहवासात राहिल्यास

वागून सतत चांगले राहावे. उपदेश देण्याचे काम करतात .व्यक्तींवर उपकार करून त्यांना मोक्ष मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतात. व्यक्तींकडून परतफेड होत नाही.,असे स्पष्ट केले. चौसाळ्यातील पहिले महिला कीर्तनकार महिला कीर्तनकार असल्याने गावातील त्यांच्या कीर्तनाला आवर्जून उपस्थिती होती .सदर आयोजित केलेल्या सप्त्यामध्ये गावातील ह. भ .प. सचिन सोनवणे सर महाराज यांचे प्रवचन झाले तसेच ह .भ. प .डॉ.अनिता पोथरकर यांचे देखील झाले.उद्या ह.भ.प.आनंद काका देशमुख यांच्यासह नागरिकांचे आयोजित केले आहे. या महिला कीर्तनाच्या व्यासपीठावर काशीबाई राऊत, सिंधुबाई तोडकर, चंदा नायकवडे ,ताई नाईकवाडे, वृंदावनी सातपुते ,आशा तोडकर, यमुनाबाई गुंजाळ ,सुधामती चौधरी यांच्यासह अन्य महिला व पुरुष मंडळी उपस्थित होते. सदर सप्ताह आठ दि.०९/०८/२०२५ पासून सुरू असून १६/ ८ /२०२५ रोजी सांगता होणार आहे. या आयोजित केलेल्या सप्त्यात दैनंदिनी काकडा, पारायण, हरिपाठ याच्यासह शिवपुराण कथेचा देखील आयोजन करण्यात आला आहे. तरी याचा सर्व गावकरी मंडळांनी व परिसरातील मंडळींनी लाभ घ्यावा ,असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

### श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग

विद्यालयातील विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी वस्तू केंद्राच्या वतीने दादासाहेबांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन,श्री स्वामी समर्थ महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूजन करुन झाली.यामुळे बालसंस्कार विभागातील कु अंजली यादव,चि. मोहित चिंचोलकर यांनी स्वागत गीत सादर केले.या सत्संग मेळाव्यासाठी पत्रकार,माजलगाव शहरासह तालुक्यातील सर्व साप्ताहिक केंद्रातील महिला, पुरुष,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.

### बालरंगभूमी परिषदेतर्फे

वाजता सुरू होणाऱ्या या स्पर्धेत सुमारे ३०० ते ३५० बालकलावंत सहभागी होतील. छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास विविध कलामाध्यमांतून रसिकांसमोर उभा राहणार आहे. स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवणारे सहा संघ अंतिम फेरीसाठी २३ व २४ ऑगस्ट रोजी मुंबई येथे पाठवले जातील. रसिकांनी या उपक्रमाचा मनसोक्त आनंद घ्यावा, असे आवाहन बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, कार्यवाह डॉ. संजय पाटील देवळाणकर, सहकार्यवाह स्नेहल पाठक, विलास सोनवणे, मिलिंद शिवणीकर, अनिता शिंदे, दुष्यंता रामटेके, अमित गाढे, नामदेव साळुंखे, विजय राख, सिद्धार्थ अग्रवाल, दीपक गिरी, रोहित पुराणिक, असलम शेख, सुरेश साळुंखे, बालासाहेब कांबळे, अनुराधा चिंचोलकर, दीपक जमदाडे, पवन शिंदे व सुरेश थोरात यांनी केले आहे.

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गडावर

विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार दि.११ ऑगस्ट रोजी श्रावण निमित्त पंचक्रोशीतील संपूर्ण बंजारा समाजातर्फे श्री.कुंभेश्वरास गंगोदकाचा जलाभिषेक नंतर परंपरेप्रमाणे पंचक्रोशीतील बंजारा समाज बांधवांच्या वतीने बंजारा समाजाच्या वतीने भजन झाले. यानंतर ह.भ.प. लक्ष्मण महाराज पवार व ह.भ.प. बळीराम महाराज राठोड यांचे बंजारा हरिकिर्तन व नंतर सुप्रसिध्द किर्तनकार ह.भ.प.श्री.योगेश महाराज आमटे (खळेगांव) यांचे किर्तन झाले नंतर पंचक्रोशीतील सर्व बंजारा समाज व भक्तगण मंडळींच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांसह पंचक्रोशीतील टाळकरी, वारकरी तसेच महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शेवटी पंचक्रोशीतील बंजारा समाज बांधव व भक्तगण मंडळी यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दूर झालेले वर्गमित्र, मैत्रिणी, गुरुजन २३ वर्षानंतर पुन्हा एकत्र

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मित्रा निस्वार्थ प्रेमाचा तुझा सहवास हवा मैत्रीच्या नात्यात विश्वास निर्माण करू नवा कवितील या ओळींप्रमाणे वयाच्या १६-१७ व्या वर्षी पूढील शिक्षणासाठी एकमेकांपासून दूर झालेले वर्गमित्र, मैत्रिणी आणि त्यांचे गुरुजन २३ वर्षानंतर पुन्हा एकत्र आले. निमित्त होते तालुक्यातील सोमनाथ बोरगाव येथील श्री दत्त माध्यमिक विद्यालयील शैक्षणिक वर्ष २००१-२००२ च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या स्नेहमिलन मेळाव्याचे.



आवडते मज मनापासून शाळा, लाविते लळा जशी माऊली बाळा....! शाळा ही प्रत्येकाच्या जीवनात आई-वडिलानंतर संस्काराची शिदोरी आणि उज्वल भविष्याची वाट दाखवणारी असते. ज्या शाळेत आपण शिकलो, मोठे झालो ती शाळा आणि त्या आठवणी आपण कधीच विसरू शकत नाही हे सत्य आहे. जुन्या आठवणींची पाने चाळताना मोरपीस हातात पडते, मोरपीस गालावर फिरवताना आठवणींशी नातं जडते. या आठवणीत बुडून जाताना नाही आजचे राहत भान. क्षण आता ते परत न येतील, तीच होती सुखाची खाण. या विचारांप्रमाणे या विद्यार्थ्यांनी ७-८ महिन्यापूर्वी सोशल मीडियाद्वारे एकत्र येवून आपल्या स्नेहमिलनाची मुहुर्तमेढ रचत रविवार दि. १० ऑगस्ट ही तारीख निश्चित केली.

त्यानुसार यादिवशी सकाळी श्री दत्त माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात एकत्रित आलेल्या वर्गमित्रांनी हातात हात घेवून स्नेहमिलन फेरी काढली. येथील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी सेवानिवृत श्रीमती शोभा गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक काकडे, हनुमंत आपेट, चंद्रकांत सोळंके, ग्यानदेव सुरवसे, लालासाहेब चोपडे, सुरेश मंत्री यांची व्यासपिठावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, सर्व गुरूजनांचे पुजन, स्वागत करून कार्यक्रमाला सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब कांबळे याने केले. पहिल्या सत्रात वर्ग मित्र-मैत्रिणींनी बालपणीच्या आठवणी तसेच स्वंय परिचयातून आपल्या कुटुंबाची माहिती आदान प्रदान केली. तर आशा जाधव, मीरा सांगेकर, सुषमा गिराम, वैशाली येडे, हरिदास बारगुले, सारीका पवार, राहुल देशमुख, पांडु कोरडे यांनी प्रभावी भाषणे करीत सर्वांना मंत्रमुग्ध केले. तर तत्कालीन शिक्षकांनी सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींचे कौतुक करित विविध क्षेत्रात निर्माण केलेल्या प्रभुत्वाबद्दल अभिमान असल्याचे सांगत प्रतिकुल परिस्थितीवर मात करित जे शक्य होईल ते ज्ञान दिले, आता आपल्या पाल्याकडे लक्ष द्या. ती पिढी चांगली घडवा असा मौलाचा सल्ला दिला. अध्यक्षीय भाषणाने पहिल्या सत्राचा समारोप झाला. दुस-या सत्रात या विद्यार्थ्यांनी परत एकदा आपला वर्ग भरवून तत्कालीन शिक्षकांकडून शिकून पुन्हा एकदा शाळेत आल्याचा अनुभव घेतला.

## पोलीस ठाण्यात महिला पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ

**जालना । प्रतिनिधी**

**तालुका जालना पोलीस ठाण्यात धुमाकूळ घालून कर्तव्यावर असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ केल्याप्रकरणी तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गैरप्रकार सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घडला होता.**

यासंदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, तालुका जालना ठाण्याच्या फौजदार अरुणा नरवडे ह्या कर्तव्यावर असतांना सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास दिलीप जाधव हा पोलीस ठाण्यात आला आणि तु त्या बाईची तक्रार का घेतली, अशी विचारणा करीत अरुणा नरवडे यांच्यासोबत हुज्जत घालु लागला. तुझा साहेब कोण आहे, त्याचे नाव सांग असे म्हणुन दिलीप जाधवसह त्याच्या दोन्ही साथीदारांनी त्या महिलेची तक्रार घेतल्याच्या कारणावरुन राडा घालत महिला पोलीस अरुणा नरवडे यांना स्वत:कडील मोबाईल फेकुन मारला. तर दोन्ही साथीदारांनी शिवीगाळ करीत उलट स्वत:चे कपडे फाडून घेत तुमची एसपींकडे तक्रार करतो आणि तुमच्या विरोधात समाजाचा मोर्चा आणतो, असे म्हणुन धमकावले. याप्रकरणी अरुणा नरवडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरील तिघांविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १३२, २२४, २९६, ३५१ (२) (३), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा अधिक तपास फौजदार डिगंबर पवार हे करीत आहेत.



### हिंदुस्तान पेट्रोलियम पेट्रोल पंपाचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

आज बीड नाथापुर रोड नाळवंडी नाका, आदित्य कॉलेज जवळ ॲड. सचिन ायकवाड यांच्या हिंदुस्तान पेट्रोलियम या पेट्रोल पंपाचे उद्घाटन एडवोकेट चंद्रकांत नवले यांच्या शुभहस्ते संपन्न झाले यावेळी सोबत शिवसेनेचे माजी शहरप्रमुख तथा न. प. बीड चे माजी सभापती श्री संजय भाऊ नलावडे, शिवसेनेचे माजी उपशहर प्रमुख तथा न. प. बीड चे माजी सभापती श्री. शहाजीराव गायकवाड, मानकूर वाडीचे सरपंच श्री. माऊली जोगदंड, या कामाचे कॉन्ट्रॅक्टर बबनरावजी बनसोडे साहेब, अभिमानजी शेलार, प्रतापरावजी साहेबराव गायकवाड, उमेश गायकवाड, नितीन गायकवाड, इंजिनीयर राहुलजी अबुज, सोपानरावजी खांडेकर, आसारामजी मुळे मामा, पवन शेटे तसेच परिसरातील इतर मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य ठिकाणी जिल्हा वाशियांचे सेवेसाठी पेट्रोल पंप उपलब्ध करून दिल्याने उपस्थित सर्व मान्यवरांनी ॲड. सचिन गायकवाड यांचे स्वागत व कौतुक करून आभार मानले.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-२९४ दिनांक-०१/०८/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मुस्तफा मुबारक शेख रा. अंबड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | मुस्तफा मुबारक शेख | स्वत: | १२/१२/१९९९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३३ दिनांक-२५/०६/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सय्यद समरीन सय्यद जफर बागवान रा. भार्डी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | अब्दुल रयमान जफर सय्यद | मुलगा | २८/०५/२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

cmyk

# ड्रॅगन फ्रूट विकास योजना: शेतकऱ्यांना मिळणार २ लाख ७० हजारांचं अनुदान

## शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सरकारकडून योजना

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सरकारकडून अनेक योजना राबवल्या जातात. भारतातील शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने अमेरिकेला भारतातील कृषी आणि दुग्ध बाजारपेठेत प्रवेश दिलेला नाही. जेणेकरून शेतकऱ्यांचा नफा कमी होऊ नये. आता बिहार सरकारने ड्रॅगन फ्रूटचे उत्पादन वाढवण्यासाठी ड्रॅगन फ्रूट विकास योजना सुरू केली आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना २०२५-२६ ते २०२६-२७ या आर्थिक वर्षापर्यंत अनुदानाचा लाभ मिळेल.

काय आहे ड्रॅगन फ्रूट विकास योजना?

बिहार सरकारच्या कृषी विभागाने या योजनेसाठी १ कोटी २६ लाख ९० हजार रुपये ठेवले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील २३ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. बाजारात ड्रॅगन फ्रूटची वाढती मागणी आणि त्याचे पोषण लक्षात घेता सरकारने त्याचा फायदेशीर पिकांमध्ये समावेश केला आहे. उत्पादन वाढवून शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढू शकते असे सरकारचे म्हणणे आहे. योजनेत दोन टप्प्यात लाभाची रक्कम दिली जाईल.



कोणत्या शेतकऱ्यांना अनुदान मिळणार?

या योजनेत राज्यातील लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. ड्रॅगन फ्रूटच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी, शेतकऱ्यांना ०.१ हेक्टर ते २.० हेक्टर जमिनीवर ड्रॅगन फ्रूट लागवडीसाठी अनुदान दिले जाईल. या योजनेत शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदत मिळणार नाही, तर ड्रॅगन फ्रूट कसे लावायचे आणि कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात याची माहिती देखील दिली जाईल. सरकारच्या मते, प्रति हेक्टर ५००० ड्रॅगन फ्रूट रोपे लावता येतात. त्याची किंमत सुमारे ६.७५ लाख रुपये आहे. यामध्ये शेतकऱ्यांना सुमारे ४० टक्के म्हणजेच २.७० लाख रुपये अनुदान देता येते. अनुदानाची रक्कम दोन हप्त्यांमध्ये दिली जाईल. ज्यामध्ये पहिला हप्ता १.६२ लाख रुपये असेल. त्यानंतर दुसरा हप्ता १.०८ लाख रुपये असेल.

### शेतकऱ्यांची निवड कशी केली जाईल?

या योजनेतील बजेट मर्यादित असल्याने, शेतकऱ्यांची निवड लॉटरी पद्धतीने केली जाईल. जेणेकरून पारदर्शकता राखली जाईल. याशिवाय, योजनेचा लाभ फक्त गरजू आणि पात्र शेतकऱ्यांनाच मिळेल याची खात्री केली जाईल. सरकारने असे लक्ष्य ठेवले आहे की अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा आणि ड्रॅगन फ्रूटची लागवड करावी आणि उत्पादन वाढवावे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न तर वाढेलच पण बिहार ड्रॅगन फ्रूटच्या उत्पादनातही अव्वल स्थानावर राहू शकेल.

# कोंबड्यांमध्ये आढळणारा जीवघेणा आजार 'पांढरा अतिसार'

ग्रामीण अर्थव्यवस्थेत कुक्कुटपालनाला विशेष महत्व आहे, कारण अनेक लोकांसाठी कमाईचे मुख्य साधन देखील आहे. कुक्कुटपालनात कोंबड्या आजारी पडल्याने या व्यवसायाला आणि पर्यायाने कुक्कुटपालकांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते. असाच एक जीवघेणा आजार म्हणजे पांढरा अतिसार/जुलाब. या रोगाला पांढरी हगवण किंवा पुलोरम या नावाने सुद्धा ओळखतात.

पांढरा अतिसार रोग म्हणजे काय? : या आजारात कोंबड्यांच्या विष्ठेचा रंग पूर्णपणे पांढरा होतो आणि शौच करताना त्यांना खूप वेदना होतात. काही वेळा पांढऱ्या जुलाबाच्या आजाराने काही पक्षी आंधळे किंवा पांगळे होतात. जुलाबामुळे कोंबड्या आणि पिल्लांचा मागचा भागही चिकट होतो. पांढरा अतिसार किंवा जुलाब हा रोग प्रामुख्याने पिलांमध्ये होतो, यामुळे बहुतेक पिल्ले मरतात. नंतर हा रोग कोंबड्यांमध्ये पसरतो. या रोगाची लागण झालेल्या अंड्यांमधील भ्रूण मरतात.

पांढरा अतिसार रोग उपचार : कोणत्याही पशुवैद्यकीय दुकानात तुम्हाला पांढऱ्या अतिसाराचे औषध सहज मिळू शकते. कोंबड्या आणि पिल्लांनाही त्यांच्या डोसनुसार औषध द्यावे. जर तुम्ही ५ कोंबड्यांना किंवा २० पिलांना औषध देत असाल तर २ चिमूटभर औषध एका कप पाण्यात विरघळवून घ्या आणि आजारी पिलांना २-२ थेंब आणि



कोंबड्यांना ५-५ थेंब सिरिंजद्वारे सलग तीन दिवस द्या. असे केल्याने डोस ओव्हरडोस होत नाही आणि त्यांचा आरामही लवकर येतो.


औषध देण्याची पद्धत : पांढऱ्या अतिसाराच्या आजारापासून मुक्त होण्यासाठी तुम्ही तुमच्या कोंबड्या किंवा पिल्लांना त्यांच्या पिण्याच्या पाण्यात विरघळवून औषध देऊ शकता. या पद्धतीने ४० पिल्ले किंवा १० कोंबड्या एका वाटीत पाण्यात सुमारे ४ चिमूटभर औषध विरघळवून कोंबड्याच्या घरात ठेवावे. हे औषध असलेले पाणी तुम्ही कोंबडीच्या पाण्याच्या भांड्यात सलग २ दिवस ठेवावे. याशिवाय, गरजेनुसार सुद्धा हे औषध असलेले पाणी प्रभावित पिलांना किंवा कोंबड्यांना पाजावे लागेल.

पांढरा अतिसार रोग प्रतिबंध : पांढऱ्या जुलाबाच्या आजारापासून कोंबड्यां आणि पिल्लांचे संरक्षण करण्यासाठी, तुम्ही कोंबड्याच्या घरामध्ये आणि आजूबाजूला स्वच्छता राखली पाहिजे. याशिवाय, कोंबड्यांना आणि पिलांना कमीत कमी प्रमाणात टेट्रासाइक्लिन पावडर/लिक्सेन पावडर/फुरासोल पावडर देऊन हा धोकादायक आजार टाळता येतो.

# असे करा कपाशी पिकामधील पातेगळ नियंत्रण

कापूस हे एक नगदी पीक आहे. जगातील कपाशीखालील क्षेत्राच्या एक चतुर्थांश क्षेत्र भारतात कापूस लागवडीखाली आहे. भारताच्या महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात कापसाचे पीक घेतात. तसेच गुजरात, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांतही कापसाची लागवड केली जाते. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्याला 'पांढऱ्या सोन्याचा जिल्हा' म्हणून ओळखल्या जाते. सध्या बहुतांश कापूस उत्पादक जिल्ह्यात कपाशीची पेरणी पूर्ण झाली आहे. सध्याचे बदलते हवामान पाहता परिणाम पिकांवर होत असून त्याच्या अन्नसाखळीत खंड पडतो आहे. कारण यामुळे जमिनीतील मूळ हे अन्नद्रव्ये घेऊ शकत नाही. परिणामी नैसर्गिकरीत्या कापसाच्या किंवा कोणत्याही पिकाची पातेगळ होते.

कापूस पातेगळ होण्यास कारणीभूत घटक : सुर्यप्रकाश कमी असणे,वाढलेले तापमान,पावसाचा खंड / जमीनीत ओल नसणे, ढगाळ हवामान इ. या घटकांमध्ये विपरीत बदल होतो. त्यामुळे झाडामध्ये तयार होणारे अन्नघटकाचे पात्या, फुले व बोंडे या भागांकडे वहन होण्यास अडथळा येतो व परिणामी त्यांची गळ होते. वाढलेल्या तापमानामुळे किंवा उमलणाया फुलांवर पाऊस पडल्यामुळे परागसिंचन आवश्यक त्या प्रमाणात होत नाही. तसेच फुलांवरील किडीमुळे पाते फुलांची गळ होते. उशीरा लागवड झालेल्या पिकामध्ये गळ होण्याचे प्रमाण अधिक आढळते. कोरडवाहू लागवडीमध्ये पावसाची दीर्घकाळ उघडीप असणे व त्याच्या जोडीला तापमानात झालेली वाढ यामुळे पातेगळ होते. महाराष्ट्र मध्ये लागवड जून-जुलै महिन्यात होते. सुरुवातीच्या



काळात पाते लागण्याच्या वेळी जुलै -ऑगस्ट महिन्यात ढगाळ हवामानामुळे पिकाला सूर्यप्रकाश अपूरा मिळतो. त्याचप्रमाणे बोंडे लागण्याच्या काळात ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पावसाचा खंड पडल्यामुळे ओल कमी होते. या कारणांमुळे पाते, फुले व बोंडाची गळ होते.

कापूस पातेगळसाठी उपाय : पाणी जमिनीत साचणार नाही म्हणून जमीन उत्तम निचयाची असावी फुले लागण्याच्या अवस्थेत अधिक तापमान, ढगाळ हवामान किंवा पावसाचा खंड येणार नाही अशाप्रमाणे लागवड करावी.पीक व्यवस्थापन : एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन द्वारे आवश्यक अन्नद्रव्यांचा पुरवठा करावा. फवारणीद्वारे विद्राव्य खतांचा योग्य वेळी वापर करावा. शरीर क्रियात्मक कारणांमुळे होणाऱ्या पातेगळ साठी २० पी पी एम नॅप्थॅलीन ॲसिटिक ॲसिड (एन ए ए) ची फवारणी करावी. संजीवकाची फवारणी करताना त्यात अन्य कोणतेही रसायन मिसळू नये. पाते लागणे ते फुले लागण्याच्या काळात २% डी ए पी (२०० ग्रॅम प्रति १० लिटर) खताची १-२ वेळा फवारणी करावी. एनएए व डीएपी च्या फवारण्या शक्यतो सकाळ किंवा सायंकाळी कराव्या. बागायती लागवडीमध्ये त्याचप्रमाणे नत्रयुक्त खते व वाढ संप्रेरकांचा वापर अधिक केल्यास काही वाणांमध्ये अवास्तव कायिक वाढ होते. अशावेळी पाने फुलांची गळ होऊ शकते. कायिक वाढ सिमीत ठेवण्यासाठी वाढ रोधक यांचा (मेक्काट क्लोराईड ५० पी पी एम-१२ मिली /१० लिटर) फवारणीद्वारे पाते लागताना वापर करावा. यामुळे कायिक वाढ कमी होऊन उपलब्ध ओलाव्याचा वापर पाते, फुले व बोंडे वाढीसाठी होईल.विद्राव्य खतांचा वापर : फवारणीद्वारे विद्राव्य खते दिल्यास लवकर उपलब्ध होतात. पाते / बोंडे येण्याच्या अवस्थेमध्ये डि. ए. पी किंवा युरिया खताची २% (२०० ग्रॅम / १० लिटर) प्रमाणात फवारणी करावी. तसेच फुले लागणे व बोंडे भरण्याच्या काळात पोटॅशिअम नायट्रेट (१३:०:४५) २% प्रमाणात फवारणीद्वारे द्यावे. रासायनिक पद्धत : सद्यस्थितीत सुरु असलेला पावसाने फुलात पाणी साचून बुरशी तयार होते त्यामुळे फुलगळ होते ते थांबवण्यासाठी बाविस्टीन हे बुरशीनाशक १५ ते २० ग्रॅम प्रती पंप कोणत्याही गरजेनुसार कीटकनाशकां सोबत फवारणी करा. त्याचप्रमाणे जमिनीत पाणी साचू न देता त्याला जमिनीच्या उतारानुसार बाहेर काढा.

# मिरची वरील लिफ कर्ल वायरस नियंत्रणाची माहिती

महाराष्ट्र राज्यात मिरची हे एक प्रमुख भाजीपाला तसेच मसाल्याचे पीक आहे. आजकाल सर्व मिरची उत्पादक शेतकरी एका मोठ्या समस्येने ग्रस्त असतात. ही समस्या म्हणजे मिरची पिकावर लिफ कर्ल व्हायरसचा अटॅक होय. या रोगाला महाराष्ट्रातील विविध भागात विविध प्रकारचे नाव आहेत जसे की,चुरडा मुरडा,घुबड्या, बोकड्या इत्यादी नावाने हा रोग ओळखला जातो. हा रोग विषाणूजन्य असून या रोगावर कुठलाही प्रकारचा उपाय नसून हा रोग येऊच नये यासाठी उपाययोजना करणे फार महत्त्वाचे असते.

लिफ कर्ल वायरसचे परिणाम : पानांच्या कडा वरच्या दिशेने मुडपतात. शिरा पिवळ्या पडतात. पानांचा आकार कमी होतो. झाडांची वाढ खुंटते. जुनी पाने खरबडीत आणि जाड होतात. फळांची गुच्छ लहान आकाराची होतात. मिरचीवरील चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव प्रथम रोपवाटिकेत होतो. या रोपांची आपल्या शेतात लागवड केल्यानंतर १० ते १५ दिवसात म्हणजे जुलै-ऑगस्टमध्ये प्रादुर्भावास

सुरुवात होते. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यामध्ये हा रोग शेतभर पसरतो. रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्याने व त्यांचे नियंत्रण होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना पीक सोडून द्यावे लागले.

व्हायरस चे स्वरूप : या रोगाचा प्रसार प्रामुख्याने फुलकिडे,मावा, तुडतुडे,पांढरी माशी इत्यादी रसशोषक किडी मार्फत होतो. जेव्हा या किडींचा प्रादुर्भाव मिरचीच्या झाडावर होतो तेव्हा विषाणू रसासोबत किडींच्या शरीरात प्रवेश करतो.



पुढे निरोगी वनस्पतीवर या किडी रस शोषण करताना हा विषाणू निरोगी झाडांमध्ये प्रवेश करतो.

मिरची वरील वायरससाठी एकात्मिक उपाय : मिरची लागवड करण्यापूर्वी तयार रोपांच्या निर्मिती करिता वापरण्यात येणारे बियाणे खात्रीशीर व दर्जेदार असल्याची खात्री करावी. रोपवाटिकेच्या चारी बाजूने नेट किंवा कपडा बांधावा. जेणेकरून बाहेरील रसशोषण करणाऱ्या किडी रोपवाटिकेमध्ये येऊ शकणार नाहीत. या रोगाचा प्रसार रसशोषक किडी मार्फत होतो. त्यामुळे आपण शेतात १० निळे चिकट सापळे आणि १० पिवळे चिकट सापळे लावावेत. अतिरिक्त पाण्याचा आणि अन्नद्रव्यांचा वापर टाळावा. जेणेकरून रसशोषक किडींचा प्रादुर्भाव जास्त होणार नाही. शेताच्या चारही बाजूला किंवा मिरची पिकामध्ये तीन ओळींनंतर मका,ज्वारी,चवळी इत्यादी सापळा पिकांची लागवड करावी. लागवडीकरिता प्लॅस्टिक मल्चिंगचा वापर केल्यास पांढऱ्या माशीचे प्रमाण कमी राहते. मिरची पिकामध्ये तण काढून स्वच्छता ठेवणे फार महत्वाचे आहे. सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नीम तेलाची २ मिली प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी.

रासायनिक उपाययोजना : पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी १० ग्रॅम डायफेनथुराँन ५० डब्ल्यू पी (पेगासस, सिजेंटा) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मावा, तुडतुडे यांच्या नियंत्रणासाठी ४ ग्रॅम थायमेथोक्झाम (ॲक्टरा, सिंजेटा) किंवा ४ मिली इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल (कॉन्फिडोर, बायर) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रीजंट, बायर (फिप्रोनील ५ एस. सी). १५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अपेक्स ५०, क्रिस्टल क्रॉप सायन्स ( इमामेक्टीन बेन्झोएट १.५ %+ फिप्रोनिल ३.५ % एस. सी.) २५ मिली /१० लिटर पाणी. वरील कीटकनाशकांचा गरजेनुसार आलटून-पालटून फवारण्या घ्याव्यात. फवारणी ही सकाळी ११ च्या आत किंवा सायंकाळी ४ च्या नंतर करावी. फवारणी साठी योग्य पीएच चे म्हणजेच ६.५ ते ७.५ चे पानी वापरावे. फवारणी करताना जमिनीत ओलावा असेल याची काळजी घ्यावी. वारे जर जास्त वेगाने वाहत असेल तर फवारणी घेऊ नये. फवारणी द्रावण तयार करताना एक घटक पाण्यात टाकून पानी २ मिनिट चांगले ढवळावे व नंतर दूसरा घटक मिसळावा. म्हणजेच एकदम सर्व घटक पाण्यात मिसळू नये. फवारणी करताना स्टीकर चा अवलंब अवश्य करावा.




### महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्त्वाचा तह केला.
१७९९ : रणजितसिंग यांनी लाहोर ताब्यात घेतले व ते पंजाबचे सम्राट झाले.
१९२० : पनामा कालव्याचे औपचारिक उद्घाटन झाले. पण याआधीच ६ वर्षे तो वाहतुकीस खुला झाला होता.
१९३५ : आषाढ शुद्ध एकादशी आषाढी एकादशी 'प्रभात'चा 'चन्द्रसेना' हा मराठी चित्रपट मुंबईच्या 'मिनर्व्हा' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. अनेक ट्रिकसीन्स असलेला हा चित्रपट याच नावाच्या मूकपटावर बेतलेला होता.
१९६० : राज्यातील भागलपूर आणि रांची विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.
१९६१ : मुठा नदीच्या आंबी या उपनदीवरील पानशेत व खडकवासला ही धरणे फुटल्यामुळे पुण्यात आलेल्या पुरात सुमारे २,००० लोक मृत्यूमुखी पडले तर १,००,००० लोक विस्थापित झाले.
१९६२ : लंडनमधील मार्क्की क्लबमधे 'द रोलिंग स्टोन्स' चा पहिला कार्यक्रम झाला.
१९७९ : किरिबातीला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८२ : राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना
१९८५ : पी. एन. भगवती यांनी भारताचे १७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
१९९८ : १६ व्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत यजमान फ्रान्सने गतविजेत्या ब्राझिलचा ३-० असा पराभव करुन विश्वकरंडक जिंकला.
१९९९ : 'महाराष्ट्र भूषण' हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार सुनील गावसकर यांना प्रदान करण्यात आला.
२००१ : कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना 'टिळक पुरस्कार' जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०० : १०० ई .पूर्व : रोमन सम्राट ज्यूलियस सीझर यांचा जन्म.
१८१७ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (मृत्यू: ६ मे १८६२)
**ख्रिस्त पूर्व १००:** ज्यूलियस सीझर रोमन सम्राट (मृत्यू: ख्रिस्त पूर्व ४२)
१८५२ : अर्जेन्टीनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचा जन्म.
१८५४ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १४ मार्च १९३२)
१८६३ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (मृत्यू: ३१ डिसेंबर १९२६)
१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१९०९ : बिमल रॉय प्रथितयश दिग्दर्शक (मृत्यू: ८ जानेवारी १९६६)
१९१३ : इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून २०१०)
१९२० : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १४ जुलै २००८)
१९४७ : भारतीय क्रिकेट खेळाडू पूचिया कृष्णमूर्ती यांचा जन्म.
१९६१ : भारतीय अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९६५ : संजय मांजरेकर भारतीय क्रिकेट भाष्यकार आणि माजी यष्टिरक्षक क्रिकेटपटू
१९८२ : अर्जुन पुरस्कार विजेता महिला टेबल टेनिसपटू अचंत शरत कमल यांचा जन्मदिन.
१९९७ : युवा नोबल पारितोषिक विजेता पाकिस्तानी स्त्रीवादी शैक्षणिक कार्यकर्त्या महिला मलाला यूसुफजई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४८९ : दिल्ली येथील लोदी वंशाचे संस्थापक व शासक बहलूल खान लोदी यांचे निधन.
१६६० : बाजी प्रभू देशपांडे (जन्म: ? ? १६१५)
१६६५ : अलेक्झांडर कार्टराईट बेसबॉलचे जनक (जन्म: १७ एप्रिल १८२०)
१९१० : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रोलस्? यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८७७)
१९४९ : आयर्लंड चे पहिले राष्ट्राध्यक्ष डग्लस हाइड यांचे निधन.
१९९४ : हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीचा चालताबोलता इतिहास मानले जाणारे पटकथाकार व 'बॉम्बे पब्लिसिटी सर्व्हिस'चे वसंत साठे (आवारा, श्री ४२०, मेरा नाम जोकर, डॉ. कोटणीसकी अमर कहानी, राम तेरी गंगा मैली) (जन्म: )
१९९९ : राजेंद्रकुमार हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: २० जुलै १९२९)
२००० : मराठी कवयित्री इंदिरा संत यांचे निधन.
२००१ : देवांग मेहता तंत्रज्ञान अग्रणी (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२०१२ : दारा सिंग मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (जन्म: १९ नोव्हेंबर १९२८)
२०१३ : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (जन्म: १२ फेब्रुवारी १९२०)
२०१३ : बोस कॉर्पोरेशन चे स्थापक अमर बोस यांचे निधन. (जन्म: २ नोव्हेंबर १९२९)

# रेणुकामाता संस्थानातील शिवमहापुराण कथेच्या सांगतेस जनसागर लोटला

## शिवमहापुराण कथेच्या श्रवणाने आत्मशुध्दीचे पुण्य - शालीग्राम महाराज; कथेच्या आयोजनाने आत्मिक समाधान लाभले - अण्णा महाराज

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजीपासून करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सांगता दि.१० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी झाली. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस रेणुकामाता संस्थानाचा परिसर गर्दीने तुडुंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन दि.४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजीपासून दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत करण्यात आले होते. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शालीग्राम महाराज मते लोणीकर यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबली



आहे. याप्रसंगी सिंथ वादक ह.भ.प.माऊली महाराज घुमरे, तर तबला वादक ह.भ.प.जगन्नाथ महाराज कराळे यांची व इतर सहकारी यांचीही त्यांना चांगली साथ मिळाली. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिवभक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याचबरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिवमहापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिले आहे. यात प्रामुख्याने धन संग्रह, रागाचा त्याग, अन्नाचा त्याग, संध्याकाळ, खरं बोलणे, निष्काम कर्म, अनावश्यक इच्छांचा त्याग करणं, मोहाचा त्याग करणं, सकारात्मक कल्पनाशक्ती, प्राणी नव्हे तर माणूस बना यांविषयी सविस्तर असे वर्णन ह.भ.प.शालीग्राम महाराज मते लोणीकर यांनी या सात दिवसीय संपूर्ण शिवमहापुराण कथेत केले. यावेळी याच्या सांगतेप्रसंगी बोलतांना श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख अण्णा महाराज दुटाळ हे अतिशय भावूक झाले होते. ते म्हणाले की, या शिवमहापुराण कथेच्या समारोपाच्या क्षणाला आज आपण आलो आहोत. याचे एका डोळ्यात आनंद आहे तर दुसऱ्या डोळ्यात दुःख आहे. की उद्यापासून या कथेचे श्रवण आपणांस होणार नाही.

या कल्पनेनेच संपूर्ण उर भरुन आले आहे. भगवान शिव महादेवाची सेवा, कृपा, लिला, आशिर्वाद काय आहे हे यातून अगदी जवळून अनूभवता आले. अगदी सुरुवातीपासून ते सांगतेपर्यंत आपण सर्वांनी दिलेला भरभरुन प्रतिसाद मनाला समाधान देणार आहे. हा प्रतिसाद पाहूनच आम्हाला एक नवी ऊर्जा मिळाली असून या अनुषंगाने पुढील वर्षीही श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आपण याठिकाणी या शिवमहापुराण कथेचं आयोजन करणार असून गेल्यावर्षीप्रमाणेच यावर्षीच्या शिवमहापुराण कथेच्या सोहळ्यालाही असंख्य जणांचे हातभार लागले असून काहीच कमी पडले नाही. त्यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम भव्य दिव्य असाच झाला आहे. व यापुढेही असेच सहकार्य लाभत राहील असे बोलत अण्णा महाराज दुटाळ यांनी सर्वांचे आभार मानले. दरम्यान समस्त वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरली असून या कथेची सांगता दि.१० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी झाली. यावेळी या शिवमहापुराण कथेच्या सांगतेची महाप्रसादाची पंगत देणारे आचारी महादेव राऊत व परमेश्वर राठोड यांचाही संयोजकांच्या वतीने आभार सत्कार करण्यात आला.

तसेच याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचाही आभार सत्कार करण्यात आला. आणि मुख्य म्हणजे आपल्या लेखणीच्या माध्यमातून या अध्यात्मिक कार्याला अधिकतेने उजाळा देणारे वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचाही संयोजकांनी आभार सत्कार करुन त्यांचे आभार मानले. सांगतेच्या या कार्यक्रमाला वडवणीसह पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, असंख्य मान्यवर, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर्स, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस रेणुकामाता संस्थानाचा परिसर गर्दीने तुडूंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

## तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने पांढरेश्वर मंदिरामध्ये महाप्रसादाचे वाटप



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील पांढरेश्वर महादेव मंदिरामध्ये तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने भाविक भक्तांसाठी भंडारा अर्थात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या पांढरेश्वर महादेव मंदिरामध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने भंडारा अर्थात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नामांकित कीर्तनकार बोधले महाराज यांचे सुश्राव्य किर्तन झाले.कीर्तनानंतर आलेल्या भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यातले होते यावेळी मोठ्या संख्येने गावकरी व भाविक भक्त उपस्थित होते.

## डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे होणार :एस.एम.देशमुख

मुंबई। प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम असलेल्या ''डिजिटल मिडिया परिषदे'' चे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली आहे. डिजिटल मिडियात काम करणारया पत्रकारांसाठी अ. भा. मराठी पत्रकार परिषदेने डिजिटल मिडिया परिषद या नावाचा स्वतंत्र विभाग सुरू केला आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात आता डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या असून या माध्यमातील २००० पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले आहेत.. उर्वरित जिल्ह्यात शाखा स्थापन करण्याची प्रकिया सुरू आहे..

परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणारया अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश आहे..

१४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होईल.. डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं होतील.. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे.. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणारया संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल. डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.. अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडली जाणार आहे. डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चॅनल्स



तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख नाही... ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत. प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.. त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे

### अधिवेशनास उपस्थित राहावे

डिजिटल मिडियाच्या या पहिल्या अधिवेशनास डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, कार्यक्रमाचे निमंत्रक आणि संभाजीनगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे.

## हंबर्डे महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

आष्टी। प्रतिनिधी

सालाबाद प्रमाणे याहीवर्षी सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ सकाळी १० वाजता आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ॲड. बी.डी. हंबर्डे महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा संधी की संघर्ष, न्याय पालिकेचे स्वातंत्र्य व राजकीय हस्तक्षेप, कृषी तंत्रज्ञानात कृत्रिम बुद्धिमत्तेचे योगदान हे तीन वक्तृत्व स्पर्धेचे विषय आहेत. प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिकाच्या स्वरूपात अनुक्रमे ५००१रु, ३००१रु, २००१ रु, प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह प्रदान करण्यात येणार असून संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे,अतुल शेठ मेहेर,दिलीप शेठ वर्धमाने,सर्व मान्यवर संचालक मंडळ तसेच प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक समितीच्या वतीने उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब मुटकुळे, उपप्राचार्य अविनाश कंदले, डॉ.रवी सातभाई, डॉ.अभय शिंदे, प्रा.जैनुल्ला खान पठाण, डॉ.रमेश भारुडकर, डॉ.संतोष वनगुजरे, प्रा.विजय अग्रवाल, डॉ.राजाराम सोनटक्के, प्रा.चंद्रकांत कोकणे, विशाल वर्धमाने, प्रा.रवींद्र डोंगरे, विद्यार्थी संसद व सांस्कृतिक मंडळ हे परिश्रम घेत आहेत. ही स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खुली राहील. स्पर्धकांनी आपले विचार फक्त मराठी भाषेतच मांडावेत. प्रत्येक स्पर्धकाला पाच मिनिटे वेळ मिळेल. स्पर्धेसंबंधी परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील असे संयोजक समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे. जास्तीत जास्त स्पर्धकांनी या वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यावा असे प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे यांनी आवाहन केले आहे.

## पिंपळवंडी येथील श्री.सोमेश्वर मंदिरात उद्या सामुदायिक महाप्रसाद

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी जवळील बीड-आहिल्यानगर प्रमुख राज्य महामार्गावरील श्री.सोमेश्वर मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे श्रावण महिन्यात महिनाभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

प्रत्येक श्रावणी सोमवार रोजी भाविकांना मसाला दुधाचा प्रसाद वाटप केला जातो.तसेच या महिन्यात मंदिरात रात्री ८ ते ११ दरम्यान शिवलीलामृत ग्रंथाचे पोथी वाचन सुरू असून त्याची समाप्ती दि.१३/०८/२०२५ बुधवार रोजी होत असून त्यानिमित्त बुधवारी महाप्रसाद (भंडारा) वाटप केला जाणार आहे.तसेच यानिमित्त सकाळी ११ ते १२ या वेळेत ह.भ.प.सुदर्शन महाराज साखरे (आळंदी) यांचे प्रवचन होणार आहे.त्यानंतर महाप्रसाद होईल. महाप्रसादाचा व प्रवचनाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन तरुण मित्र मंडळ, ग्रामस्थ पिंपळवंडी,वाडी-वस्ती व पुजारी अश्रू वाघमारे (गुरव) यांच्या वतीने करण्यात येत आहे.


### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १२३१/ २०२५**

**ॲड. काचमांडे यु.ए. यांचे मार्फत**

**रोहिणी वि. श्वेतांबरी**

ज्याअर्थी - विकास मारोती काकडे, हे दिनांक २६.१२.२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजी नगर, येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी १ आरती भ्र. विकास काकडे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम रा. जरुड, ता. जि.बीड, २. ओमकार पि.विकास काकडे, वय २० वर्षे, धंदा शिक्षण रा. जरुड, ता. जि.बीड, ३. अभिजीत पि. विकास काकडे, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण रा. जरुड, ता. जि.बीड, ४ पूजा पि. विकास काकडे, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण रा. जरुड, ता.जि.बीड, ५. पार्वतीबाई भ्र.मारुती काकडे, वय ६६ वर्षे, धंदा शिक्षण रा. जरुड, ता. जि. बीड, अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ मयताचे मुले आहेत. तर अर्जदार क्र. ४ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार क्र. ५ ही मयताची आई आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना /अर्जदाराला सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०३.०९.२०२५ ही आहे.**

**आज दिनांक ०४.०८. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

आदेशावरुन,
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

**कनिष्ठ लिपिक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर, बीड


## मोफत ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्याचा माधव महाराज डाके याचा उपक्रम

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक तथा ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते श्री. ह भ प माधव महाराज डाके काठवडेकर यांनी माऊली ज्ञानोबारायांच्या सातशे पन्नासाव्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ५१ ज्ञानेश्वरी ग्रंथ मोफत वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. बीड शहरातील वारकरी सांप्रदायिक कीर्तनकार श्री.ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अर्थात माऊली ज्ञानोबरायांच्या चालू असणाऱ्या सातशे पन्नासाव्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त पन्नास ज्ञानेश्वरी ग्रंथ मोफत वाटपाचा आगळा वेगळा उपक्रम हाती घेतला असून, आजवर ज्यांच्या घरात ज्ञानेश्वरी पोहोचलेली नाही, ज्ञानेश्वरी वाचनाचे स्वर घुमले नाही, ज्यांना आयुष्यात ज्ञानेश्वरीची वाचन आणि श्रवण साधना घडली नाही. अशा घरात ज्ञानेश्वरीचा प्रचार , प्रसार व्हावा या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला असल्याचे पत्रकात डाके महाराजांनी म्हटले आहे.

ज्या लोकांना ज्ञानेश्वरी जाणून वा समजून घेण्याचे कुतूहल आहे. अशा भाविक लोकांच्या घरात ज्ञानेश्वरी पोहोचती करून ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून माऊली ज्ञानोबारायांचे विचार घरोघरी पोहोचवण्याचा संकल्प हरिभक्त परायण माधव महाराज डाके यांनी केला असून, पन्नास श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्याचा उपक्रम त्यांनी या माऊलींच्या सातशे पन्नासाव्या जन्म शताब्दी वर्षा निमित्त हाती घेतला आहे. लवकरच अशा गरजू तथा इच्छुक भाविक भक्तांच्या घरी स्वतः जाऊन ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय वाचून, भाविकांच्या हातात ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्याचा संकल्प ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी केला आहे. या उपक्रमात सहभागी होऊन याचा लाभ गरजू तथा भाविक ज्ञानेश्वरी वाचकांनी घ्यावा असे आवाहन माधव महाराज डाके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## नारायणगड व सामाजिक कार्याच्या सदैव पाठीशी-खा.बजरंग सोनवणे

बीड। प्रतिनिधी

श्री क्षेत्र नारायण गडाच्या वतीने महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली गोरगरीब व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मुलांना शिक्षणा दरम्यान निवासासाठी उत्तम वस्तीगृहाची केलेली व्यवस्था वाखाण्याजोगी असून यामुळे अनेक विद्यार्थ्यांना लाभ मिळेल. श्री क्षेत्र नारायणगडाचा विकास व महंतांच्या सामाजिक कार्याला सदैव सक्षम पाठींबा असेल. लवकरच महंत शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात भव्य संत संमेलन आयोजित करणार असल्याची माहिती खा बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिली आहे.

श्री क्षेत्र नारायण गडाच्या माध्यमातून बीड शहरा जवळील तळेगाव शिवारात महंत शिवाजी महाराज यांच्या कल्पनेतुन जवळपास दहा कोटी रुपये खर्च करून सर्व सोयींनीयुक्त सुंदर मुलांचे वस्तीगृह उभारले आहे. काल खा. बजरंग बप्पा सोनवणे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी



महंत शिवाजी महाराज त्यांची सदिच्छा भेट घेऊन वस्तीगृहाची पाहणी केली.यावेळी बोलताना खा. बजरंग सोनवणे म्हणाले की, श्री क्षेत्र नारायण गड संस्थानच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, कामगार, गोरगरीब सामान्यांच्या हितासाठी उपक्रम चालू आहेत व भविष्यात ही नवीन उपक्रम सुरू करावेत. महंत शिवाजी महाराज यांचे कार्य लोकाभिमुख आहे. त्यांच्या कृपा आशीर्वादाने होणाऱ्या सामाजहित कार्यास आपला तन-मन-धनाने पाठिंबा असेल. असे आश्वासीत केले आहे. लोकसभा निवडणुकीत सामान्य जनांबरोबर साधुसंत महंत महाराजांचे सहकार्य व आशीर्वाद मला लाभले. विजया नंतर साधू संतांच्या चरणी लीन होण्याचा मानस व्यक्त केला होता. या अनुषंगाने आज महंतासी चर्चा केली. लवकरच बीड जिल्ह्यात महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य संत संमेलन आयोजित करणार असल्याची माहिती खासदार बजरंग सोनवणे यांनी दिली आहे.

## सहाय्यक अभियंता प्रशांत राठोड यांच्यावर गुन्हा दाखल करा-मुस्ताक मोमीन

पात्रुड / प्रतिनिधी

मौजे पात्रुड येथील महावितरण म. रा. वि. वि. कंपनी सहाय्यक अभियंता श्री. प्रशांत धनराज राठोड हे आपल्या अधिकाराचा व पदाचा गैरवापर करून सर्वसामान्य लोकांना परेशान करून पैशाची मागणी करीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक अपहार, भ्रष्टाचार करीत आहेत. तसेच त्यांनी सबस्टेशन जाणारी ३३ के.व्ही. लाईनच्या तारा अनाधिकृतपणे काढून घेऊन जाऊन अपहार केला आहे. याबाबतची चौकशी होऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करा असे निवेदन मुस्ताक मोमीन यांनी मा. कार्यकारी अभियंता महावितरण विभागीय कार्यालय अंबाजोगाई यांना दिले आहे.

याबाबत सविस्तर आसे की, पात्रुड ते सबस्टेशन जाणारी सर्वे नं. २१९ मधील डमी लाईन ३३ के. व्ही. लाईनच्या ६ पोलच्या तारा सहाय्यक अभियंता प्रशांत धर्मराज राठोड यांनी अनधिकृतपणे शासनाची कसलीही परवानगी न घेता राजकीय लोकांशी संगणमत करून व आर्थिक व्यवहार करून सदर ताराबाई कायदेशीर रित्या काढून घेऊन जाऊन अपहार केलेला आहे, मौजे पात्रुड शिवारातून तेलगाव ते माजलगाव ला जाणारी जुनी ३३ के.व्ही. लाईन सर्वे नं.९९/१ शिवार पात्रुड येथील ८ पोलच्या तारा सहाय्यक अभियंता प्रशांत राठोड यांनी अनधिकृत रीत्या काढून सदर तारा अनेक लोकांना विक्री केलेले आहेत व अपहार केलेला आहे.

मौजे लवूळ चौफळा पात्रुड येथे असलेल्या ११ के. व्ही. चे पोलची कसलीही रीतसर परवानगी नसताना विविध लोकांकडून आर्थिक लाभ घेऊन सदर ठिकाणी पोलचे दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर केले आहेत, मौजे पात्रुड शिवारातील पात्रुड कॅम्प समोरील आय.टी.आय. शाळेमधून जाणारे ३ पोल हे बेकायदेशीर रित्या पैसे घेऊन इतर ठिकाणी स्थलांतरित केलेले आहे, मौजे पात्रुड येथील सर्वे नं. ०५ मधील ०७ पोल वरील ११ के.व्ही. ची लाईन संबंधित प्लॉट धारकाकडून आर्थिक व्यवहार करून शासनाची पूर्वपरवानगी न घेता प्लॉटिंग मधून जाणाऱ्या ०७ पोलचे स्थलांतर इतर ठिकाणी केलेले आहे, मौजे पात्रुड शिवारातील पात्रुड गावठाण नवीन फिटर वरून पात्रुड वतसाहतीच्या पुढे काजी यांचे लाकडी गट्टूच्या कारखान्यास आर्थिक व्यवहार करून ११ के.व्ही. वरून ४ पोल ओढून अनाधिकृत रीत्या लाईन ओढून डी.पी. बसवून दिलेली आहे, मौजे पात्रुड ते ढोरगाव गावठाण फिटर येथून ढोरगाव ते लऊळ जाणाऱ्या रस्त्यावर कोंबडीचे शेड धारकांना पैसे घेऊन सात आठ पोल ची लाईन ओढून अनाधिकृत डी.पी. बसवून दिलेली आहे, मौजे पात्रुड येथील ग्लोबल इंग्लिश स्कूल यांचेकडून आर्थिक लाभ घेऊन त्यांना डीपी मंजूर नसताना ११ के. व्ही. वरून ३ पोल ओढून डी.पी. बसून दिलेली आहे, आम्ही स्वतः सहाय्यक अभियंता श्री. प्रशांत धनराज राठोड यांना वरील गैर प्रकाराबाबत विचारणा केली असता ते म्हणाले की, माझी वरपर्यंत पोच आहे, माझे कुणीही काहीही वाकडे करू शकत नाही, माझ्याविरुद्ध कुठेही अर्ज दिला व कारवाई केली तर तुमच्या विरुद्ध शासकीय कामात अडथळा केल्याप्रकरणी खोट्या केसेस दाखल करील अशी धमकी देऊन आमच्याशी हुज्जत घातली आहे. त्यामुळे वरील सर्व बाबी बाबत सखोल चौकशी करण्यात यावी व यामध्ये सहाय्यक अभियंता श्री. प्रशांत धनराज राठोड व इतर दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी व केलेल्या कारवाईबाबत आम्हास अवगत करावे.

मौजे पात्रुड येथील महावितरण म. रा. वि. वि. कंपनी सहाय्यक अभियंता श्री. प्रशांत धनराज राठोड हे आपल्या अधिकाराचा व पदाचा गैरवापर करून शासनाच्या पैशातून म. रा. वि. वि. कंपनीच्या असलेले पोल व तारा बेकायदेशीर विनापरवाना काढून घेऊन अनेक लोकांना विक्री केलेल्या आहेत त्यामुळे सदर प्रकरणाची तात्काळ सखोल चौकशी करून श्री. प्रशांत धनराज राठोड यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करावे नसता आम्ही दि. १५/८/२०२५ रोजी बीड जिल्ह्यातील कोणत्याही शासकीय कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहोत.

त्याचे होणारे परिणामास सर्वस्वी आपण स्वतः व आपले कार्यालय जबाबदार राहील असे निवेदन मुस्ताक हाजीमिया मोमीन यांनी मा. कार्यकारी अभियंता महावितरण विभाग कार्यालय अंबाजोगाई यांना दिलेले आहे.

cmyk



# वराह चोरीच्या वादातून रस्त्यावरच तुफान राडा

## दगडफेक, तलवारीच्या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

**मोरेवाडी शिवारात वराह चोरीच्या कुरापतीवरून सुरू झालेल्या वादातून झालेल्या तलवार आणि दगडफेकीत दोन्ही बाजूंनी गंभीर जखमी होण्याचा प्रकार घडला आहे. या घटनेत परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांतील एकूण आठ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात प्राणघातक हल्ला केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

घटनेविषयी मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिनेश लक्ष्मण जाधव (रा. सदर बाजार, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १० ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजता ते व त्यांचे भाऊ भारत जाधव स्विफ्ट डिझायर गाडीतून भावाच्या जोगाईवाडी शिवारातील घरी जात होते. मोरेवाडीतील लाल सटवा मेंडके यांच्या घरासमोरून जात असताना गाडीच्या मागील काचेला जोरात आवाज आला. गाडी थांबविल्यावर लाला भागवत मेंडके, सुजीत उर्फ सुरज सटवा मेंडके, सटवा भागवत मेंडके आणि पवन दर मेंडके (सर्व रा. मोरेवाडी, अंबाजोगाई) यांनी घेराव घातला. भीतीपोटी तेथून निघून कॉलेजसमोर गाडी थांबवल्यानंतर आरोपी पुन्हा दोन दुचाक्यांवर आले. त्यांनी 'जनावरे चोरतोस का?' असा सवाल करत तलवारीने भारत जाधव यांच्या डोक्यात वार केला. बचाव करताना दिनेश जाधव यांच्या तळहातावर गंभीर जखम झाली. त्यानंतर दगडफेक करून भावंडांसह युवराज मेंडके, हेमंत जिरंगे यांनाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर फिर्यादीवरून लाला मेंडके, सुजीत मेंडके, सटवा मेंडके आणि पवन मेंडके यांच्याविरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला. दरम्यान, लाला भागवत मेंडके (रा. मोरेवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच दिवशी दुपारी अडीच वाजता भारत जाधव व त्यांचे सहकारी स्विफ्ट डिझायर गाडी थेट त्यांच्या घरासमोर आणून उभी केली. गाडी हटविण्याविषयी विचारणा केली असता 'तुझे डुकरे आम्ही चोरून विकले, काही करु शकत नाहीस' असे म्हणत शिवीगाळ केल्याचा दावा फिर्यादीने केला. त्यानंतर तो, त्याचा भाऊ सटवा व पुतण्या सुरज पोलिस स्टेशनकडे तक्रार करण्यासाठी निघाले असता, कॉलेजजवळ भारत लक्ष्मण जाधव, दिनेश लक्ष्मण जाधव, युवराज बाबुराव गायकवाड व हेमंत धिरंगे (सर्व रा. सदर बाजार, अंबाजोगाई) हे तलवार व लोखंडी रॉड घेऊन आले. त्यांनी सटवा मेंडके यांच्या हातावर, दिनेश यांनी छातीवर, तर युवराज यांनी गळ्यावर तलवारीने वार करून जखमी केले. सुरज मेंडके यांच्यावरही तलवारीने हल्ला झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीच्या आधारे चारही आरोपींवर प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेत दोन्ही बाजूंतील अनेक जण जखमी झाले असून, तलवार आणि दगडफेकीत गाडीचेही नुकसान झाले आहे. अंबाजोगाई शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

## श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग घराघरात, मनामनात पोहोचवणे काळाची गरज –मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित सत्संग मेळाव्यात अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील गुरुपुत्र युवा संत चंद्रकांत मोरे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की,श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या ग्रामाभियानांतर्गत अठरा विभागाच्या माध्यमातून २०% अध्यात्म आणि ८०% सामाजिक उपक्रम राबविले जातात.अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून डोळस श्रद्धा, सेवाभाव यामधून मनःशांती प्रदान करण्याचे काम भारत देशासह जगातील २१ देशांमध्ये हजारो सेवा केंद्राच्या माध्यमातून चालू आहे याचा कोट्यावधी भाविक अनुभव घेत आहेत. हरवलेली मनःशांती पुनर्जिवीत करण्यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा घराघरात, मनामनात



पोहोचवणे ही खरी स्वामींची सेवा आहे.

पर्जन्यसुवृष्टी,राष्ट्र कल्याणार्थ श्रावण महिन्यानिमीत्त श्री रुद्र लिंगार्चन, सामुहिक नवनाथ भक्तिसार पारायण सेवा यावेळी घेण्यात आली. तसेच शहरातील मुकबधीर ◀◀ पान ३ वर

# राखी बांधण्यासाठी बहिणीकडे जात असताना भावाचा अपघातात मृत्यू

जालना । प्रतिनिधी

बदनापूर छत्रपती संभाजीनगरजालना महामार्गावर सोमवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात मोटारसायकलस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही हृदय पिळवटून टाकणारी घटना बदनापूर पोलीस ठाण्यासमोर सकाळी अंदाजे ९ वाजता घडली.

मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव संजय सुंदराव चंदनपाट (वय ४८, रा. जडगाव, जि. छत्रपती संभाजीनगर) असे असून ते राखी पौर्णिमेनिमित्त जालना तालुक्यातील काळेगाव येथे राहणाऱ्या बहिणीकडे जात होते. मोटारसायकल (क्र. एम.एच. २० जि.टी. २६७४) वरून जात असताना बस (क्र. एम.एच. १४ एम.एच. १६७९) ने जोरदार धडक दिली. या धडकेनंतर ते बसच्या मागील चाकाखाली जागीच ठार झाले.अपघात एवढा भीषण होता की घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी काही क्षण डोळे मिटून घेतले. विशेष म्हणजे, या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हातगाड्या, रिक्षा आणि वाहने उभी राहिल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि अपघातांचा ◀◀ पान ३ वर



# धर्मादाय उपआयुक्त चौधरी यांच्या चौकशीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक न्यास कार्यालयाचे प्रमुख प्रदीप मगनलाल चौधरी यांनी मागील अनेक दिवसांमध्ये बेकायदेशीर व नियम बाह्य कामे करून लाखोंची माया जमा केल्याच्या अनेकांनी तक्रारी लातूर आणि मुंबई येथील वरिष्ठ कार्यालयाकडे आल्या आहेत. तरी अद्याप या प्रकरणाची कसली ही चौकशी झाली नसल्याने माजी आ. बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, प्रगत विद्या प्रसारक मंडळ कुसळंब ता. पाटोदा आजीव सभासद बाळासाहेब पवार, नामलगाव ता बीड ग्रामस्थ व देवस्थानचे विश्वस्त, मोहीमाता शिक्षण संस्था मादळमोही ता. गेवराईचे सचिव वरूनराज सानप, श्रीराम पंचायतन दादेगावचे ता. आष्टी विश्वस्त गंगाधर पोटे, योगेश्वरी देवीचे भक्त ॲड.अनुपमकुमार बिडकर, अलरशीद शिक्षण संस्था बीडचे पिरजादे अहेमद यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देऊन प्रदीप चौधरी यांनी आतापर्यंत केलेल्या कामाची व त्यांनी दिलेल्या निकालाची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी केली. सदर निवेदन देताना आ.धनंजय मुंडे आणि आ. विजयसिंह पंडित हे उपस्थित होते.




# सपोनि गडवे वाळूमाफियांसाठी ठरत आहेत कर्दनकाळ

## वाळूच्या ट्रॅक्टर वर,व देशी दारू विक्रत्यावर कारवाई : बारा लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तलवाडा | प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील चंकलबा पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि राजशे गडवे, व त्यांचे सहकारी उमापुर हद्दीत गस्त घालत असतांना दिं.१० रोजी मौजे गायकवाड जळगाव येथील नदीतून वेळ१७.०० वा वाळू भरून टॅक्टर जळगाव फाटयाकडे जात असल्याची माहिती मिळताच प्रभारी सपोनि राजेश गडवे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत वाळूच्या टॅक्टर चा पाठलाग करून ट्रॅक्टर पकडला .**

यामध्ये सपोनि राजेश गडवे त्यांचे सहकारी पोउपनि पाटील , चालक सुरवसे, पोअं घोंगडे, पोह घनशाम केदार यांनी मोठी कारवाई केली , या कारवाईत विनापरवाना वाळू वाहतूक करणारा टॅक्टर पकडून , पोह घनशाम केदार यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करून, टॅक्टर वर गुन्हा दाखल करून आकरा लाख नव्वद हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.सपोनि गडवे यांच्या आदेशाने पुढील तपासासाठी एन .पी.सी गुजर यांच्याकडे देण्यात आला आहे .वाळू माफियांना गडवे यांनी चौथा दणका दिला आहे . गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून एपीआय राजेश गडवे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार घेतच दोन नंबर वाल्यांना दणका दिला आहे,एक पाठोपाठ धडक चार कारवाया करत अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याने तालुक्यात या कारवाईचे कौतुक होत आहे.पदभार घेतच धडक कारवाईला सुरुवात करून सपोनि राजेश गडवे यांनी आपल्या कार्याची तत्परता दाखवून दिली.दिनांक १० रोजी पेट्रोलिंग दरम्यान गायकवाड जळगाव या गावात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी जळगाव येथील सरकारी दवाखान्याजवळ टॅक्टर पकडला, तसचे दिं.१० रोजी सायंकाळी उमापुर फाट्यावर अवैधरित्या देशी दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच सपोनि राजेश गडवे सह कर्मचाऱ्यांनी छापा मारला असता चार हजार आठशे रुपयांची देशी दारू मुद्देमाल जप्त करून व आरोपी ताब्यात घेण्यात आला आहे, महाराष्ट्र दारू बंदी कायदेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला ही कार्यवाही केल्याने वाळू माफियांना,व अवैध धंदे वाल्यांना चांगलाच दणका बसला असून एपीआय राजेश गडवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कारवाईचे कौतुक चकलांबा ग्रामस्थांकडून होत आहे

# संताच्या सहवासात राहिल्यास व्यक्तीला पुण्य लाभते –ह.भ.प. भारती हुंबे महाराज

चौसाळा । प्रतिनिधी

संसारात व्यक्तीला सतत अडचणी येतात. खरे सुख आणि मोक्ष मिळण्यासाठी व्यक्तीने संतांची संगत आणि सहवास राहावे. संत हे व्यक्तीला योग्य उपदेश करून त्यांच्यावर उपकार करतात, असे प्रतिपादन चौसाळा येथील महिला कीर्तनकार ह. भ. प. भारती महाराज हुंबे यांनी सांगितले. चौसाळा येथील हनुमान मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी हरिनाम सप्ताह व शिवपुराण याचे आयोजन करण्यात आले आहे .आयोजित केलेल्या ह .भ. प. भारती महाराजांनी सांगितले की, समाजात व्यक्तीला खरे सुख व प्रामाणिकपणाने ◀◀ पान ३ वर




# रक्षाबंधन व क्रांती दिन कार्यक्रम उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कै.दे.बा.गणगे योगेश्वरी नूतन विद्यालय प्रा.विद्यालयात ९ ऑगस्ट क्रांती दिन व रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती कल्पना यन्नावार होत्या , प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधिकारी संग्राम सांगवे, मुख्याध्यापक के.बी. नांदगावकर,शिक्षक प्रतिनिधी अनंत जोशी, सकाळ सत्र प्रमुख इंगळेवाड, काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षक ढेंबरे आदी उपस्थित होते.

सांगवे यांनी विद्यार्थ्यांना पोलिसांचे कार्य व त्यांची मदत कशी घ्यायची याविषयी माहिती सांगितली. मुख्याध्यापक नांदगावकर यांनी विद्यार्थ्यांना क्रांतिकारकांसारखे कार्य करा खूप अभ्यास करा असे बहुमूल्य मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात श्रीमती कल्पना यन्नावार यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच वृक्ष लावण्यास प्रोत्साहित केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यात महत्त्वाचा वाटा असणारे वृक्ष असतात, म्हणून झाडांना राखी बांधण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन होऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. संग्राम सांगवे यांना विद्यार्थिनी प्रतिनिधी कु.श्रेया लाड हिने राखी बांधली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार सांस्कृतिक प्रमुख स्नेहा बर्दापुरे यांनी मानले. यावेळी शिक्षिका,शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# पत्रकार अविनाश कदम यांना वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

अहिल्यानगर येथील अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने आयोजित रोझ गोल्ड हॉटेल येथे रविवार दि १० ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय ''वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार'' २०२५ सोहळ्यात, आष्टी येथील लोकमत/मराठवाडा साथीचे तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष व मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा उपाध्यक्ष अविनाश कदम हे पत्रकार क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत असल्याने त्यांची दखल घेऊन त्यांना आदर्श पत्रकार म्हणून वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, रिल स्टार शिवानी बनकर, ॲक्टर सचिन चव्हाण, ॲक्टर अर्जुन अंबेकर, संस्थेचे अध्यक्ष तुषार बोरूडे, सिमा डुकरे यांच्या हस्ते देण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत जाधव यांनी केले तर बहारदार सुत्रसंचालन उत्कृष्ट निवेदिका सिमा डुकरे यांनी केले तर आभार विशाल खिळे यांनी मानले.या कार्यक्रमास नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बालरंगभूमी परिषदेतर्फे राबविणार १२ ऑगस्टला 'इतिहास महाराष्ट्राचा'

बीड । प्रतिनिधी

बालरंगभूमी परिषदेतर्फे 'इतिहास महाराष्ट्राचा' हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबवला जात असून, बीड जिल्ह्यातील कार्यक्रम १२ ऑगस्ट रोजी होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवापासून ते राज्याभिषेक सोहळ्यापर्यंतचा इतिहास नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला व वक्तृत्व या विविध कलामाध्यमांतून मंचावर सादर केला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत मुलांसाठी इतिहासातील घटनांवर आधारित स्पर्धा घेण्यात येणार असून ती तीन गटांत होईल, दोन एकल गट आणि एक समूह गट. गेवराई, माजलगाव, उमरी आणि बीडमधील अनेक शाळा व वर्गातून बालकलावंत सहभागी होणार आहेत. स्पर्धा सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होईल. कार्यक्रमाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते होईल, तर प्रमुख अतिथी म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित राहतील, अशी माहिती बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर यांनी दिली. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलम शिर्केसामंत यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ◀◀ पान ३ वर

# समाजाने बुद्धांचे विचार आत्मसात करावे – दत्ता कांबळे

## समृद्धीचे नामकरण भन्ते धम्मप्रिय यांच्या हस्ते धम्म संस्कारविधीने संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

शहरालगत असणारे पुनर्वसित ब्रम्हगाव येथील आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या कन्येचा दैदीप्यमान असा प्रथम वाढदिवस व नामकरण सोहळ्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

सदरील नामकरण हे दादर मुंबई येथील चैत्यभूमीचे कोषाध्यक्ष भन्ते धम्मप्रिय यांच्या हस्ते बौद्ध धम्म पद्धतीने संस्कारविधी करून समृद्धी दत्ता कांबळे असे नामकरण कार्यक्रम हजारोच्या गर्दीत संपन्न झाला. सदरील नामकरण हे आंबेडकरी चळवळीचे प्रणेते कालवश कर्मवीर ॲड.एकनाथ आवाड यांच्या धम्म चळवळीतील प्रेरणाने प्रेरित होऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्म चळवळीचा विचारांचा प्रचार व प्रसार करण्या बरोबरच समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने टाकलेले एक क्रांतिकारी पाऊल असून, समाजाने बुद्धांचे विचार आत्मसात करावे असा संदेश सदरील नामकरणाच्या माध्यमातून समाजामध्ये पोहचला.




# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गडावर कुंभेश्वर यात्रा महोत्सव उत्साहात

## श्रावण विशेष ; बंजारा समाजाच्या वतीने कुंभेश्वरास गंगोदकाचा जलाभिषेक

गेवराई । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव ता.गेवराई येथे प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी यांच्या अध्यक्षतेखाली श्रावण महिन्यातील तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्त कुंभेश्वर यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रा महोत्सवात पंचक्रोशीतील बंजारा समाजाच्या वतीने कुंभेश्वरास गंगोदकाचा जलाभिषेक करुन परंपरेप्रमाणे बंजारा समाजाचे भजन झाले यानंतर सुप्रसिध्द किर्तनकार ह.भ.प.श्री.योगेश महाराज आमटे (खळेगांव) यांचे सुश्राव्य असे किर्तन झाले. दरम्यान यावेळी कुंभेश्वराच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केल्याने मंदिर परिसर गजबजून गेला होता. यावेळी महंत गुरुवर्य दत्ता महाराज गिरी, माजी आमदार अमरसिंह पंडित, युवा नेते यशराज पंडित, संभाजीनगरचे मुख्य वित्त अधिकारी उत्तमभाऊ चव्हाण , सामाजिक कार्यकर्त्या सुशिला मोराळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव येथे महंत दत्ता महाराज गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण महिन्यात ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष
मंगळवार, दि.१२ ऑगस्ट २०२५ । पान ७

# पिंपरी चिंचवड महालपालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीला कामाला गती!

## सर्व नागरी सेवा एकाच ठिकाणी देण्यासाठी ९१ हजार चौरस मीटरमध्ये उभारली जात आहे अत्याधुनिक सुविधा असलेली ग्रीन इमारत

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना महापालिकेच्या सर्व सुविधा एकाच छताखाली देण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशाने उभारण्यात येत असलेल्या पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली आहे. जानेवारी २०२३ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचे महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. या इमारतीचे सद्यस्थितीत ६२ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम देखील प्रगतीपथावर आहे.

महापालिकेने हा प्रकल्प ३६ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक इमारतीमध्ये महापालिकेची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी केंद्रीभूत करणे, नागरी सेवा अधिक सुलभ करणे आणि प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे हा मुख्य उद्देश आहे.महापालिकेच्या नवीन इमारतीचे तळघरातील तीन मजले आणि तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम सध्या पूर्ण झाले आहे. पूर्णत्वास आल्यानंतर ही इमारत नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, संग्रहालय, प्रदर्शन हॉल आणि ई-गव्हर्नन्स सेंटर सारख्या अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असणार आहे. ही प्रशासकीय इमारत ८.६५ एकरच्या विस्तृत



भूखंडावर उभी राहत असून, एकूण ९१ हजार ४५९ चौरस मीटर बांधकाम क्षेत्रामध्ये विकसित केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३१२.२० कोटी खर्च अपेक्षित आहे.

ग्रीन इमारत

शाश्वत विकासाच्या दृष्टीने ही इमारत इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंटसाठी ५ स्टार ग्रीन रेटिंग आणि आयजीबीसी प्लॅटिनम रेटिंग मिळवण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार आहे. सौरऊर्जा, पाणी पुनर्वापर प्रणाली आणि ग्रीन स्पेसेस यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे पर्यावरणपूरक वातावरण टिकवून ठेवण्यास देखील मदत मिळणार आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये:

* इमारतीची रचना : ६ ते १८ मजल्यांचे चार विंग, प्रत्येकी ३ तळघरे * नवीन सुविधा : नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, ई-गव्हर्नन्स सेंटर, ग्रंथालय, क्लिनिक इत्यादी तळमजल्यावरील महत्त्वाच्या सुविधा :

* वाचनालय : १२५ चौरस मीटर
* प्रदर्शन हॉल/संग्रहालय : ३८० चौरस मीटर
* बहुउद्देशीय हॉल : ५७० चौरस मीटर

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा मिळतील. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या मदतीने ही इमारत केवळ प्रशासकीय केंद्रच नव्हे, तर शाश्वत विकासाचे प्रतीक ठरेल.

– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका – प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

नवीन प्रशासकीय इमारतीमुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवांचा विस्तार अधिक सुलभ आणि गतिमान होईल. अत्याधुनिक सुविधा आणि एकाच ठिकाणी केंद्रीभूत कार्यालयांमुळे नागरीकांना अधिक जलद आणि प्रभावी सेवा मिळतील. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा घडवेल.

–विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

नवीन प्रशासकीय इमारतीच्या यशस्वी पूर्ततेसाठी योजना आखण्यापासून ते अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर काटेकोर देखरेख ठेवण्यात येत आहे. बांधकामातील गुणवत्ता, सुरक्षितता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वेळेत प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यावर भर दिला जात आहे. महापालिकेचे हे मुख्यालय केवळ प्रशासकीय सेवांचे केंद्र म्हणून नव्हे, तर या परिसरातील मोठ्या प्रमाणातील नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी एक आदर्श आणि दिशादर्शक ठरणार आहे.

# ओबीसी समाज श्रीमंत मराठ्यांविरोधात जाऊ नये, हाच शरद पवारांच्या मंडल यात्रेचा हेतू; प्रकाश आंबेडकरांचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यात मंडल यात्रा काढण्यात येत आहे. क्रांती दिनाचे औचित्य साधत नागपुरातून सुरू केलेल्या मंडल यात्रेला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नागपूरमध्ये हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. दरम्यान, शरद पवार यांनी काढलेल्या मंडल यात्रेवर महायुती आणि भाजपनं सडकून टीका केली टीका केली आहे. अशातच या यात्रेवरून वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी टीका करत गंभीर आरोप केले आहेत.

विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना ओबीसींच्या स्कॉलरशिपला राष्ट्रवादीकडून विरोध करण्यात आला होता. ओबीसी हा श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात जातोय, श्रीमंत मराठा हा एनसीपीचा ( छउझ) बेस आहे. श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात ओबीसी



जाणार नाही, हाच या पाठीमागचा राजकीय हेतू आहे. असा आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला आहे. ओबीसींच कल्याण हा या यात्रेचे हेतू नाही. तर मागच्या निवडणुकांमध्ये ओबीसी भाजपकडे झुकला, यात दुमत नाही. मात्र आता ओबीसींच्या लक्षात आले एक नागनाथ आहे आणि दुसरा साधनाग आहे. अशी बोचरी टीका हि त्यांनी केलीय.

किती खोटं बोलावं याला एक सीमा असते– प्रकाश आंबेडकर

शरद पवार यांचा १६० जागा संदर्भातला दावा म्हणजे वराती पाठीमागून घोडं असं आहे. आम्ही यापूर्वी या सगळ्या पक्षांना म्हणालो होतो की आपण सगळेजण मिळून कोर्टात जाऊ. त्यावेळी कोणीही आमच्या सोबत आलं नाही. कोर्ट एकमेव व्यासपीठ आहे ज्या ठिकाणी दूध का दूध आणि पाणी का पाणी होतं. त्यावेळी त्यांनी ते केलं नाही. आता बोंबलत बसतात, अशी परिस्थिती आहे. शरद पवार असे म्हणतात आम्ही राहुल गांधींना भेटायला गेलो, नाव विचारले तर म्हणतात आम्हाला आठवत नाही. किती खोटं बोलावं याला एक सीमा असते.

### राज्यात ओबीसी कार्ड

'मंडल' यात्रेच्या माध्यमातून शरद पवारांचा पक्ष राज्यात ओबीसी कार्ड खेळण्याच्या तयारीत आहे. १९९० साली भाजपने या अहवालाला विरोध केला होता हे बिंबण्याचा प्रयत्न सुद्धा शरद पवारांचे नेते या निमित्ताने करत आहेत. भाजपसोबत खंबीरपणे उभा असलेल्या, त्यांच्या राजकारणाचा डीएनए बनलेल्या ओबीसी समाजाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा हा प्रयत्न मानला जात आहे.

महाराष्ट्रात १९९२ नंतर शरद पवारांच्या कार्यकाळात मंडल आयोग लागू झाला हे सांगण्यासाठी त्यांच्या राष्ट्रवादीने हा उपक्रम हाती घेतला आहे. ही यात्रा ५२ दिवस राज्यातील कानाकोपऱ्यात फिरणार असून शरद पवार यांनी मागच्या ५० वर्षात महाराष्ट्रातील ओबीसी समाजासाठी काय केले, हे सांगण्यात येणार आहे. शरद पवारांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून नागपूरमधून मंडल यात्रेला सुरुवात झाली.

अशी टीका हि प्रकाश आंबेडकर यांनी केलीय.

हा दावा मी खोटं म्हणणार नाही, अशी लोक बाजारामध्ये आहेत– प्रकाश आंबेडकर

राहुल गांधी विरोधी पक्ष नेते आहेत. त्यांच्याकडे कोण येतो, कोण जातं याची नोंद ठेवली जाते. शरद पवारच्या दोघांना घेऊन गेले त्यांची एन्ट्री राहुल गांधीच्या घरी असणार. शरद पवारांसोबत दोन माणसं कोण होती, त्यांची नावे जाहीर करू शकता, सामान्य माणसाला फसवू शकता. हा दावा मी खोटं म्हणणार नाही, अशी लोक बाजारामध्ये आहेत. मी २००४ पासून बोलतोय हे मेनूप्लेट होतंय. असेही ते म्हणाले.



# शिरूर पतसंस्थेतील २७ कोटी अपहार प्रकरणी ठेवीदारांचे अनोखे रक्षाबंधन आंदोलन

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर शहरातील आनंद नागरी सहकारी पतसंस्थेतील २७ कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करावी, या मागणीसाठी ठेवीदारांनी आज अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले. शिरूर पोलीस ठाण्यात जमलेल्या ठेवीदारांनी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना राखी बांधून आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली. यावेळी सुभाष जैन, सतीश छाजेड, योगिता लोढा, फईम सय्यद, निर्मला चाबुकस्वार, राजेंद्र दुगड यांच्यासह अनेक महिला, पुरुष आणि वृद्ध ठेवीदार उपस्थित होते.

या प्रकरणात पतसंस्थेचे अध्यक्ष अभय चोरडिया, त्यांचे नातेवाईक आणि इतरांविरुद्ध ९ जुलै २०२४ रोजी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. वर्ष उलटूनही मुख्य आरोपी अभय आणि प्रवीण चोरडिया यांना अटक झालेली नाही. ठेवीदारांनी यापूर्वी अनेकदा पोलीस ठाण्यात निवेदने दिली, मात्र ठोस कारवाई झाली नाही. यामुळे संतप्त ठेवीदारांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने हे अनोखे आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी लवकरात लवकर आरोपींना अटक करण्याचे आश्वासन दिले. तसेच, १२ ऑगस्टपासून नियोजित ठेवीदारांचे उपोषण पोलिसांच्या विनंतीनुसार स्थगित करण्यात आले. ठेवीदारांनी सांगितले की, पोलिसांनी ठोस कारवाई न केल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडले जाईल. या प्रकरणाने शिरूरमधील अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान झाले असून, ठेवीदारांना न्याय मिळावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# शिक्षण विभागातील कामकाज ठप्पच; अधिकारी बेमुदत रजेवर असल्याचा फटका

पुणे : शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी बेमुदत सामूहिक रजा आंदोलन सुरू केल्यामुळे शिक्षण विभागातील सर्व कामकाज ठप्प पडले आहे. विविध कामकाजाची प्रकरणे प्रलंबित पडली असून, कार्यालयात अधिकारीच नसल्यामुळे कार्यालये ओस पडली आहेत.

नागपूर विभागातील बोगस शालार्थ आयडीबाबतच्या प्रकरणात काही अधिकारी व कर्मचारी यांना कोणतीही चौकशी न होता अटक होत असल्याच्या घटनेचा अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाच्या वतीने ८ ऑगस्टपासून अधिकाऱ्यांनी बेमुदत सामूहिक रजा आंदोलन पुकारले आहे. शिक्षण विभागाच्या परवानगीशिवाय विनाचौकशी अटकेपासून संरक्षणाची लेखी हमी शासनाकडून मिळावी, अशी मागणीही संघटनेने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे करण्यात आली होती.

संघटनेबरोबर साधी काहीच चर्चाही केली नाही. त्यामुळे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या. अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत शिक्षण आयुक्तालयासमोर आंदोलन सुरू ठेवले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याच्या भूमिकेवर संघटना ठाम आहे. तोडगा निघेपर्यंत शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक कोणत्याही वेतन बिलावर स्वाक्षरी करणार नाहीत.नागपूर येथील घटनेची चौकशी करून दोष नसलेल्या अधिकाऱ्यांची तत्काळ मुक्तता करण्यात यावी, संबंधित घटनेबाबत शासनाने अधिकृत निवेदन जाहीर करावे, भविष्यात कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई करण्यापूर्वी चौकशी प्रक्रिया पूर्ण केली जावी, शालार्थ संबंधित सर्व प्रकरणे शिक्षण विभागाने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाकडे वर्ग करावीत, शिक्षण प्रशासनातील अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी शासनाने स्पष्ट निर्देश द्यावेत, अतिरिक्त कामाच्या ताणातुन सुटका करावी, आदी मागण्या संघटनेने शासनाकडे केल्या आहेत.

# मराठी भाषा संवर्धनासाठी नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील – अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर

पिंपरी । प्रतिनिधी

मराठी भाषा आपल्या अभिमानाशी व संस्कृतीशी घट्ट जोडलेली आहे. या भाषेच्या संवर्धनासाठी महापालिका कटिबद्ध असून अभिजात मराठी भाषा दिन आणि अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त महानगरपालिकेच्या वतीने सर्व समावेशक कार्यक्रम आणि उपक्रम राबविले जाणार आहेत, असे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले. मराठी भाषा संवर्धनासाठी शहरात कार्यरत असणाऱ्या सर्व क्षेत्रातील व्यक्तींनी आपला सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.



पिंपरी चिंचवड महापालिकेत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' नियोजन बैठक उत्साहात पार पडली

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या निर्देशानुसार येत्या ३ ऑक्टोबर रोजी 'अभिजात मराठी भाषा दिन' आणि ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित नियोजन बैठकीत अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर बोलत होत्या.

या बैठकीस उप आयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, ग्रंथपाल प्रवीण चाबुकस्वार, वर्षा जाधव, राजेंद्र आंभेरे, संगीत शिक्षक मिलिंद दलाल यांच्यासह अखिल भारतीय मरठी नाट्य परिषेदेच्या मुबई शाखेचे उपाध्यक्ष तथा पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, मराठी साहित्य परिषदेचे शर प्रमुख राजन लाखे, पिंपरी चिंचवड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदकुमार सातुर्डेकर, माजी नगर सदस्या भारती फरांदे, पिंपरी चिंचवड मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष प्रकाश निर्मल, सदस्य हेमंत जोशी, पिंपरी चिंचवड कलाकार संघाचे अध्यक्ष विजयकुमार उलपे, मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणारे प्रभाकर पवार, विकास कडलग, रुपेश पटेकर, सीमा बेलापूरकर, निलाक्षी साबळे, के डी कड, विजय जगताप, विष्णू मांजरे, प्रा, राजेंद्र सोनवणे, दत्ता गुंड, अनुराधा प्रभू, विशाल मीठे, रमेश वाकनीस, सुरेश कंक, मुरलीधर दळवी, प्रदीप गायकवाड, सुहास जोशी, मनोज डाळिंबकर, प्रणव जोशी, राजेंद्र बंग, शिवमूर्ती भडंगे, प्रतिक गायकवाड, चंद्रशेखर जोशी, सुप्रिया पांडे, सुनील भिसे, किशोर केदारी, पांडुरंग सुतार, संतोष पोकळे, तसेच मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या संस्था, संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, साहित्यिक, विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, तसेच मराठी भाषाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी 'अभिजात मराठी भाषा दिन' व 'सप्ताह' साजरा करण्यामागील उद्देश, शासनाच्या सूचना आणि महापालिकेच्या वतीने कार्यक्रमाची रूपरेषा व भूमिका याबाबत सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

# सातबारा उताऱ्यात छेडछाड; जमीन विकणाऱ्यांवर गुन्हा

नारायणगाव । प्रतिनिधी

बेल्हे (ता. जुन्नर) येथील जमिनीच्या ७/१२ उतार्यात छेडछाड करून नारायणगाव येथील दुय्यम निबंधक कार्यालयात जमिनीची विक्री केल्याप्रकरणी दुय्यम निबंधक अर्चना शैलेंद्र पाकळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाच जणांवर नारायणगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यातील दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना जुन्नर न्यायालयाने न्यायालयीन कोठडी दिल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.



याप्रकरणी जमिनीची विक्री करणारे विमल मुरलीधर विश्वासराव (वय ८४), रंजना शंकर गोरे (वय ४६, दोघीही रा. कुंभार आळी, पाबळ, ता. शिरूर), जयश्री अनिल सोलवंकर (वय ४२, रा. श्रीकृष्ण कॉलनी, थेरगाव, डांगे चौक, चिंचवड), सतीश यशवंत कुंभार (वय ३८), संतोष यशवंत कुंभार (वय ४०, दोघेही रा. सदाशिव पेठ, कुंभारवाडा, पूना हॉस्पिटलजवळ, पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. यातील संतोष कुंभार व सतीश कुंभार यांना पोलिसांनी अटक केली.बेल्हे येथील सामाईक खाते क्रमांक ३७३ मधील ११५/१ या गटाचे खरेदीदस्त बनविल्यानंतर हस्तलिखित ७/१२ व संगणकीकृत ७/१२ यांच्या पीक पाहणीत तफावत असल्याचे तपासणीत दिसून आले. खरेदीखत झाल्यानंतर याप्रकरणी जमिनीचे सहखातेदार सुनील लक्ष्मण विश्वासराव यांनी बेल्हे येथील ग्राम महसूल अधिकारी, उपविभागीय अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, दुय्यम निबंधक नारायणगाव यांच्याकडे तक्रार केली.ग्राम महसूल अधिकार्यांनी यासंबंधित दिलेला अहवाल पाहून खरेदीखतास जोडलेल्या सातबार्याची पडताळणी दुय्यम निबंधक अर्चना पाकळे यांनी केली. त्यात विश्वासराव यांच्या तक्रारीत तथ्य दिसून आले. यामुळे दुय्यम निबंधक पाकळे यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

# पुणे पोलीस आयुक्त सात पिढ्यांच्या अद्दल घडलण्याचं सोडा; सात आठवड्यातल्या घटना एकदा बघा

पुणे: सात पिढ्या लक्षात राहतील अशी अद्दल घडवू असं म्हणणाऱ्या पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडून मात्र मागच्या सात आठवड्यात होणारी गुन्हेगारी पण थांबवता आली नसल्याचे मागील काही दिवसात घडलेल्या घटनांमधून समोर आले. पुणे शहरात रात्रीच्या वेळी असू देत किंवा दिवसभरात कोयता हल्ले वाहनांची तोडफोड सोबतच चोरीच्या घटना देखील मोठ्या प्रमाणात समोर आल्यात. त्यामुळे पुणेकरांची रात्रीची झोप मात्र उडाल्याचे दिसून येत आहे. एकीकडे पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार भयमुक्त पुणे करू त्यासोबतच गुन्हेगारांची ठासू अशा शब्दात भाषण देताना दिसतात मोठ मोठ्या कार्यक्रमात भयमुक्त गणेशोत्सवाची ग्वाही देताना दिसतात. मात्र, मागील काही घटनांमध्ये पुणे पोलीस आयुक्त नेमकं करताय काय? असे प्रश्न उपस्थित झालेत.

मागील काही दिवसांत झालेल्या घटना...

२८ जून: चतुःशृंगी पोलिसांच्या हद्दीत विधाते वस्ती येथे १५ जणांचा धुडगूस.

२८ जून : सिंहगड रस्त्यावर माणिकबाग येथे चौघांनी राडा घालून १५ वाहनांची तोडफोड केली.

३ जुलै : पूना कॉलेज येथे निकाल पाहण्यासाठी गर्दी झाल्यानंतर किरकोळ कारणावरून १० ते १५ जणांनी राडा घालून, एका तरुणाला धारदार हत्याराने मारहाण केली.

५ जुलै : वानवडीत मध्यरात्री दोन गट भिडले. दारूच्या बाटल्यांनी एकमेकांना मारहाण.

१२ जुलै : कात्रज-कोंढवा रस्त्यावर सात ते आठ जणांच्या टोळक्याने दुचाकीवरून येऊन हातात कोयते आणि तलवारी घेऊन मोठमोठ्याने आरडाओरडा करून दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. एका तरुणावर हल्लाही केला.

२० जुलै : भवानी पेठ आणि कोंढवा येथे टोळक्याचा राडा.

२३ जुलै धनकवडी परिसरात गाड्यांची तोडफोड दहशत निर्माण करण्यासाठी तोडफोड४ ऑगस्ट किटकटवाडी या ठिकाणी गोळीबारानी पैठणी गाड्यांची तोडफोड ५ ऑगस्ट दोन वाहन एकमेकांना वाचण्यावरून वाद; तरुणांकडून हवेत गोळीबार ५ ऑगस्ट हडपसर भागात गाड्यांची तोडफोड, कोयते आणि तलवारीने वार ६ ऑगस्ट पुण्याच्या मध्यवर्ती भागात असलेल्या सदाशिव पेठ भागात कोयत्याने वार गाड्यांची तोडफोड, राजकीय नेत्याच्या जावयाने गाड्यांची तोडफोड केली प्रकार ७ ऑगस्ट एमआयटी कॉलेज परिसरात विद्यार्थ्यांचा राडा

cmyk